CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६ | वर्ष - ३२ | अंक ३२२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### अवैध प्रवासी वाहतुकीविरुद्ध धडक मोहीम राबविणार

**मुंबई:** राज्यभरात फोफावलेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे विना-परवाना आणि नियमबाह्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांविरुद्ध येत्या १ मार्चपासून राज्यव्यापी तीव्र मोहीम राबवण्याचे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी (२७ फेब्रुवारी) दिले. विधानभवनात आयोजित विशेष बैठकीत परिवहन मंत्री बोलत होते. यावेळी परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अवैध वाहतुकीमुळे केवळ नियमांचे उल्लंघन होत नसून, प्रवाशांच्या जीवाशी खेळ सुरू आहे. फिटनेस प्रमाणपत्र, विमा आणि परवाना नसलेली वाहने रस्त्यावर धावणे हे अपघातांना निमंत्रण देणारे आहे, असे सरनाईक यांनी यावेळी स्पष्ट केले.

### मुंबई-गोवा महामार्गावर भीषण अपघात

**रायगड :** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत मुंबई-गोवा महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात तिघे जखमी झाले असून दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. ही घटना ढालघर फाटा येथे घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आयशर ३०१८ टेम्पो (क्र. एमएच १० डीटी ८३२७ ) व समोरून येणारी मारुती सुझुकी वॅगनर (क्र. एमएच ०४ एचएफ ५६१३ ) ही कार अचानक रस्त्याच्या विरुद्ध दिशेला आली. दोन्ही वाहनांची जोरदार धडक झाली. या धडकेत दोन्ही वाहनातील लोक जखमी झाले आहेत. या अपघातात दोन्ही वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. घटनेची माहिती मिळताच माणगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तत्काळ पंचनामा करून वाहतूक सुरळीत केली.

### राज्यात आता 'सीताराम पेठ' प्रयोग

**मुंबई:** चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा व्याघ्रप्रकल्पात आर्टिफिशिअल इंटेलिजन्सच्या (-ख) सहाय्याने राबवण्यात आलेला 'सीताराम पेठ' प्रयोग आता संपूर्ण राज्यात राबवण्याचे संकेत राज्य सरकारने दिले आहेत. विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान भाजप गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांनी हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात होणारी जीवितहानी टाळण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सर्वदूर करावा, या दरेकरांच्या मागणीला वनमंत्री गणेश नाईक यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

### कर्करोगाचा धोका टाळा

**मुंबई:** विधीमंडळाच्या अधिवेशनादरम्यान प्रसारमाध्यमांशी बोलताना भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी एक गंभीर आरोग्य समस्या जगासमोर मांडली आहे. आपण सजावटीसाठी वापरत असलेली कृत्रिम फुले आणि लहान मुलांची स्वस्त खेळणी यांमधील घातक रंगांमुळे कर्करोग आणि फुफ्फुसांचे आजार बळावत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पाचपुते यांनी सांगितले की, कृत्रिम फुलांमधून रंग 'नॅनो पार्टिकल्स'च्या स्वरूपात बाहेर पडतात. हे कण श्वासोच्छवासाद्वारे आपल्या शरीरात जातात, ज्यामुळे श्वसनविकार आणि कर्करोगाचा मोठा धोका निर्माण होतो. कायदे अनेक आहेत, परंतु जोपर्यंत दोषींना शिक्षा होत नाही, तोपर्यंत परिस्थिती सुधारणार नाही, असे पाचपुते यांनी नमूद केले.

### पाच बँकांना आर्थिक दंड

**मुंबई:** आरबीआयनं महाराष्ट्रातील विटा मर्चंटस को ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, विटा या बँकेला दंड केला आहे. या बँकेला ३.१० लाख रुपयांचा दंड करण्यात आला आहे.नाममात्र सदस्यांना मर्यादेपेक्षा अधिक कर्ज दिल्याचा ठपका बँकेवर ठेवण्यात आला आहे. याशिवाय ज्या कर्जदारांना दंड लावला त्याची माहिती न दिल्याचा ठपका बँकेवर ठेवला गेला आहे. द प्रकाशपुरम को-ऑपरेटिव्ह अर्बन को ऑपरेटिव्ह लिमिटेड, तामिळनाडू ५० हजार रुपयांचा दंड आरबीआयनं केला आहे. द बेळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, कर्नाटक या बँकेला २ लाख रुपये दंड केला आहे. या बँकेला संचालकांच्या कर्जाप्रकरणी आणि इतर कारणांसाठी दंड करण्यात आला. द गुंटूर महिला सहकारी नागरी बँक मर्यादित, आंध्र प्रदेशला ५० हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे. तर द महबूबनगर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक लिमिटेड तेलंगणा या बँकेला आरबीआयनं १ लाख रुपयांचा दंड केला आहे.

# विधिमंडळ हेही विनोदांना जन्म देणारे व्यासपीठ

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. २७ फेब्रुवारी :** विधिमंडळ हेही एकप्रकारे अनेक विनोदांना जन्म देणारे व्यासपीठ आहे. कारण, येथे तिथे घडणाऱ्या घटना, विनोद जर कमी केले, तर कदाचित मराठी नाटक-चित्रपट यांच्या कथानकांमध्ये ५० टक्के घट येईल, इतका मसाला आपण सगळे मिळून साहित्यिकांना देत असतो. त्यामुळे आपणदेखील साहित्याची निर्मिती करत असतो, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुक्रवारी केले.



मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विधान भवनात आयोजित 'जावे विनोदाच्या गावा' या विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, उपसभापती नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्यासह आमदार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांनी खास शैलीत केलेल्या कोट्यांमुळे उपस्थितांमध्ये चांगलाच हशा पिकला.

मुख्यमंत्री म्हणाले, पूर्वी विधानमंडळात भाषणांमध्ये विनोद, कोट्या, व्यंग अशा अनेक छटा पाहायला मिळायच्या. अलिकडच्या २०-२५ वर्षांत विलासराव, गोपीनाथ मुंडे यांच्या भाषणांमध्ये एकमेकांवर केलेल्या कोट्या, त्यातून निर्माण होणारे विनोद असायचे. पण दुर्दैवाने अलिकडच्या काळात अनेकदा विनोदाला अस्मितेशी जोडले जाते. त्यामुळे त्या विनोदातले मर्म निघून जाते. माणूस हल्ली घाबरून-घाबरून विनोद करायला लागला आहे. आपण जे बोलतोय त्यातून काय अर्थ निघेल आणि दिवसभर माध्यमांमध्ये काय चालेल, त्यामुळे आपल्या भाषणांतला निखळ आनंद कमी झालेला आहे, अशी खंत फडणवीस यांनी भाषणात बोलून दाखवली.

**भाषेमुळे मुंबईत आल्या अडचणी**

मुंबईत आल्यानंतर सुरुवातीच्या काळात आपल्याला मराठीमुळे फार अडचणींचा सामना करावा लागल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. आपली मराठी भाषा दर ५-७ किलोमीटरवर बदलते. मी मुंबईत आलो तेव्हा सुरुवातीच्या काळात मला फार अडचणी आल्या होत्या. कारण शब्दाशब्दाला 'का बे', 'साल्या' असे 'सांस्कृतिक' मराठी मी बोलायचो. पण येथे आल्यावर मला लक्षात आले, की ही संस्कृती मुंबईला पटण्यासारखी नाही. पुण्यात तर आपल्याला बहिष्कृतच केले जाईल. त्यामुळे मी हळूहळू स्वत:ला उत्तम मराठी कसे बोलता येईल या दिशेने नेले. पण प्रत्येक भागातल्या मराठीचा आपला गोडवा आपल्याला कायम ठेवायचा आहे, असेही ते म्हणाले.

आज आपण मराठीचा गौरव करत आहोत. यानिमित्ताने आपली भाषा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचायला हवी, यासाठी आपण प्रयत्न केला पाहिजे. लोकसाहित्य, लोककला, लोकनाट्य, लोकगीते आपल्याला जिवंत कशी ठेवता येतील हे बघावे लागेल. जगात इंग्रजी सर्वात मोठी भाषा आहे. कारण ती राज्यकर्त्यांची भाषा होती. राज्यकर्त्यांची भाषा ही जगाची भाषा होते. त्यामुळे आपणही आपल्या भाषेला ज्ञानभाषेत रुपांतरीत करायला हवे. मराठी बोलणाऱ्याला मराठीमुळे प्रगती करता येते, असा भाव आपण निर्माण करायला हवा, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## सीमांचलमधून घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी लवकरच विशेष मोहिम - केंद्रीय गृहमंत्री शाह

**पटना :** सीमांचल भागातून घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी लवकरच विशेष मोहिम सुरू केली जाईल, असे विधान करत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीमांचलमधील घुसखोरीच्या प्रश्नावर कठोर भूमिका घेण्याचे संकेत दिले. ते बिहारमधील अररिया येथे एसएसबीच्या जवानांना संबोधित करताना बोलत होते. त्यांनी सांगितले की घुसखोरीमुळे या भागाच्या लोकसंख्यात्मक रचनेत बदल झाला असून तो कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही.



जवानांना संबोधित करताना त्यांनी सीमा सुरक्षा मजबूत ठेवण्याबरोबरच अवैध तस्करी, अमली पदार्थांची तस्करी (नार्कोटिक्स) आणि इतर गुन्हेगारी कारवायांवर कडक नजर ठेवण्याच्या सूचना दिल्या. यासाठी स्पष्ट एसओपी (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसीजर) तयार करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली, जेणेकरून खालच्या स्तरापर्यंत तैनात असलेले जवान पूर्णपणे सतर्क राहतील. खुल्या सीमांची सुरक्षा ही मोठे आव्हान असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अमित शाह म्हणाले की, बिहारच्या जनतेशी निवडणुकीदरम्यान घुसखोरांना बाहेर काढण्याचे आश्र्वासन देण्यात आले होते आणि ते केवळ निवडणुकीपुरते मर्यादित नव्हते. प्रत्येक घुसखोराची ओळख पटवून त्याला भारताच्या भूमीतून बाहेर केले जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. सीमांचल भागात या संदर्भातील कारवाई लवकरच सुरू होणार आहे. यापूर्वी अमित शाह यांनी किशनगंज जिल्ह्यातील पूर्व पाली येथील हनुमान मंदिरात पूजा-अर्चना केली. या वेळी बिहारचे उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी देखील त्यांच्या सोबत उपस्थित होते.

## योगी आदित्यनाथ यांच्या सिंगापूर - जापान दौऱ्यात ९०,००० कोटींचे सामंजस्य करार

सिंगापूर : उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सिंगापूर आणि जपानचा चार दिवसांचा दौरा पूर्ण केला. दोन्ही देशांच्या दौऱ्यादरम्यान, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी प्रतिष्ठित कंपन्यांच्या सीईओंची भेट घेतली. हा दौरा संपल्यानंतर मुख्यमंत्री योगी म्हणाले, जपानमध्ये आम्ही विविध कंपन्यांसोबत ९०,००० कोटींचे सामंजस्य करार केले आहेत. दरम्यान, सिंगापूरमध्ये ६०,००० कोटींचे सामंजस्य करार झाले आहेत.



मुख्यमंत्री योगी यांच्या दोन्ही देशांच्या चार दिवसांच्या दौऱ्यादरम्यान, २.५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झाले. शिवाय, उत्तर प्रदेशने जपानच्या यामानाशी प्रीफेक्चरसोबत ग्रीन हायड्रोजन तंत्रज्ञानावर करार केला आहे. यामुळे भारतीय विद्यार्थ्यांना जपानमध्ये उच्चस्तरीय प्रशिक्षण मिळेल.

जपानमधील गुंतवणूक परिषदेत राज्य सरकारला हजारो कोटी रुपयांचे चेण आणि गुंतवणुकीचे प्रस्ताव मिळाले, प्रमुख जपानी कंपन्यांमध्ये Kubota Corporation, Spark Minda (टोपो ठेन्सी सहकार्यनि), Japan -viation Electronics Industry आणि Nagase Co., Ltd. यांचा समावेश आहे.

B2G बैठकीत Suzuki Motor Corporation, Honda Cars India Ltd., Konoike Transport Co., Ltd., Mitsui Co., Ltd., Rapidus Corporation, Marubeni Corporation, Sumitomo Realty Development Co., Ltd. आणि MUFG Bank यांनी सहभाग घेतला, गुंतवणुकीची प्रमुख क्षेत्रे कृषी यंत्रसामग्री, ऑटो ओईएम आणि घटकनिर्मिती, सेमीकंडक्टर, डेटा सेंटर, ग्रीन हायड्रोजन, कंप्रेस्ड बायो गैस, लॉजिस्टिक्स आणि वेअरहाऊसिंग अशी आहेत.

जपान दौऱ्यात हरित ऊर्जा सहकार्यास चालना देत University of Yamanashi, Yamanashi Hydrogen Company, IIT Kanpur, Harcourt Butler Technical University, IIT BHU आणि Madan Mohan Malaviya University of Technology यांच्या सहकार्याने ग्रीन हायड्रोजन सेंटर ऑफ एक्सतन्स स्थापन करण्याची घो-

### शेतकरी आणि मजुरांना बिबट्यांपासून मिळणार सुरक्षा; विधान परिषदेत सरकारचा मास्टर प्लॅन

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. २७ फेब्रुवारी :** राज्यात वाढलेला बिबट्यांचा वावर आणि त्यामुळे होणारी जीवितहानी रोखण्यासाठी राज्य सरकारने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. विधान परिषदेत झालेल्या चर्चेदरम्यान, बिबट्यांच्या हल्ल्यांपासून नागरिकांचे रक्षण करण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि सॅटेलाईट प्रणालीचा वापर करून प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती सरकारने दिली. राज्यात बिबट्यांचा मानवी वस्त्यांमधील शिरकाव ही एक गंभीर सामाजिक समस्या बनली आहे. गेल्या पाच वर्षांत सुमारे ४२० नागरिकांना या हल्ल्यात प्राण गमवावे लागले आहेत. शिरूरमधील चिमुरडी आणि वृद्ध महिलेच्या मृत्यूच्या घटनेचा संदर्भ देत सभागृहात सदस्यांनी चिंता व्यक्त केली. केवळ २५ लाख रुपयांची मदत देऊन गेलेला जीव परत येणार नाही, त्यामुळे प्रशासनाने हल्ले होऊच नयेत यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी आग्रही मागणी विरोधी पक्षांसह सर्वच सदस्यांनी केली.

## कृत्रिम फुलांचा वापर करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार - फडणवीस

### शासन निर्णय काढून कारवाईबाबत स्पष्टता आणणार

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई , दि. २७ फेब्रुवारी :** राज्यातील लग्नसोहळे आणि धार्मिक कार्यक्रमांमध्ये वाढणारा कृत्रिम फुलांचा वापर पर्यावरणासह मानवी आरोग्यासाठी घातक ठरत असल्याने, अशा साहित्याचा वापर करणाऱ्यांवर आता कठोर कारवाई करण्यात येणार आहे. याबाबतचा शासन निर्णय (जीआर) काढून कारवाईबाबत स्पष्टता आणली जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (२७ फेब्रुवारी) विधानसभेत केली., कृत्रिम फुलांचा वापर करणाऱ्या डेकोरेटर्सवरही कारवाईचा बडगा उगारला जाईल, असे त्यांनी सांगितले.



भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे हा प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली. यावेळी आमदार जयंत पाटील यांनीही उपप्रश्नांद्वारे या समस्येचे गांभीर्य सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. कृत्रिम फुले आणि प्लास्टिक सजावटीच्या या साहित्यातील रसायनांमुळे डोकेदुखी, त्वचाविकार, डोळ्यांची जळजळ आणि लहान मुलांमध्ये श्र्वसनाचे त्रास उद्भवतात. दीर्घकालीन संपर्कामुळे कर्करोगाचा धोकाही संशोधनातून समोर आला आहे, असे पाचपुते यांनी सांगितले.

ही फुले नद्या किंवा जलस्रोतांत विसर्जित केल्यामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होते. तसेच, ही फुले पाळीव प्राण्यांच्या पोटात गेल्याने त्यांच्या पचनसंस्थेवरही गंभीर परिणाम होतात. कृत्रिम फुलांच्या वाढत्या वापरामुळे नैसर्गिक फुले पिकवणाऱ्या शेतकऱ्यांच्या हिताला बाधा पोहोचत आहे, असेही त्यांनी सांगितले.

**डेकोरेटर्सवरही होणार कारवाई**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अनेकदा कृत्रिम फुलांचे साहित्य जलस्रोतांत टाकले जाते, जे अत्यंत घातक आहे. शासन निर्णय काढून कारवाईबाबत स्पष्ट तरतुदी केल्या जातील. जर लग्न समारंभात सजावटीसाठी कृत्रिम फुलांचा वापर झाला, तर संबंधित डेकोरेटरवरही कठोर कारवाई केली जाईल. आपण सनातन परंपरा मानणारे आहोत, त्यामुळे धार्मिक कार्यात फुलांचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. अशा वेळी मुंबई पालिकेने नैसर्गिक फुलांची बाजारपेठ बंद केली असेल, ते ती सुरू करण्याबाबत आजच आदेश दिले जातील, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.



## संक्षिप्त...

### प्रविण खडके यांच्या हस्ते अनिल कुटवाड यांना मोटिव्हेशनल स्पीकर पुरस्कार



**रेणापूर :** श्रीराम माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय चे पर्यवेक्षक अनिल कुटवाड यांचा उपजिल्हाधिकारी गणेश पवार, लातूर विभागाचे उद्योग केंद्राचे महा व्यवस्थापक निखिल पाटिल महाव्यवस्थापक प्रविण खडके, यांच्या हस्ते मोटिवेशनल स्पीकर ऑफ ग्री इंडस्ट्री या पुरस्काराने सन्मान करून गौरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या एम. आय. डी.सी. उद्योग केंद्रामार्फत अँग्री इंडस्ट्रीमध्ये प्रेरणादायी विचार व मार्गदर्शन केल्याबद्धल त्यांच्या कार्याचा उद्योग मित्र भवन लातूर येथे आज सत्कार व गौरव सोहळा संपन्न झाला .अनिल कुटवाड बी एससी ( ग्री) बी. एड असून परभणी येथे त्यांनी कृषी पदवी घेतली. सातत्याने त्याच्या कडून कृषी व त्या संबंधीत उद्योगास मार्गदर्शन होते. त्यांच्या या कार्याबद्दल हा पुरस्कार देउन गौरव करण्यात आला. या गौरवा बद्दल रेणुका शिक्षण संस्थेचे अध्यक्ष देविदासराव कुटवाड,सचिव ड.पंडितराव उगीले,प्राचार्य सिद्धेश्र्वर मामडगे,श्रीराम प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सतीश मोरे,प्राध्यापक भरत धायगुडे सांस्कृतिक प्रमुख अमृतेश्र्वर स्वामी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या या पुरस्काराबद्दल परिसरातील शेतकरी,उद्योजक,व्यापारी, व मित्र परिवाराकडून अभिनंदन होत आहे

### निलंगा शहरातील स्वच्छतेला गती: नगराध्यक्षासह पदाधिकारी रस्त्यावर

**निलंगा :** शहरातील स्वच्छता मोहिमेला सध्या चांगलीच गती मिळाल्याचे चित्र दिसून येत आहे. नगरपरिषदेकडून शहरातील विविध भागांतील तुंबलेल्या नाल्या व गटारी काढण्याच्या कामाला युद्धपातळीवर सुरुवात करण्यात आली आहे.

शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्यासह सभापती व नगरसेवक प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून कामे करून घेत आहेत. यावेळी भाजपचे पदाधिकारी दत्ता मोहोळकर उपस्थित होते. शहरातील विविध प्रभागांमध्ये पाहणी करून तुंबलेल्या गटारी साफ करणे, नाल्यांमधील गाळ काढणे आदी कामे सुरू आहेत. निलंगा नगरपालिका प्रशासनाकडून कचरा संकलनासाठी शहरातील प्रत्येक भागात घंटागाडी पाठवण्यात येत आहे. मात्र काही नागरिक मुद्दाम कचरा घंटागाडीत न टाकता उघड्यावर टाकत असल्याने शहरात दुर्गंधी पसरत असून आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी कचरा उघड्यावर न टाकता घंटागाडीतच टाकावा, असे आवाहन नगरपरिषदेकडून मुख्याधिकारी संतोष लोमटे व नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांच्यावतीने करण्यात येत आहे.

घंटागाडी येत नसेल तत्काळ संपर्क साधावा शहर स्वच्छ ठेवणे ही केवळ नगरपरिषदेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. सर्वांनी सहकार्य केल्यास निलंगा शहर स्वच्छ व आदर्श बनू शकते, ज्या भागात घंटागाडी कचरा संकलनासाठी नियमित येत नसेल तर तेथील नागरिकांनी नगरपरिषदेत संपर्क साधावा असे आवाहन नगराध्यक्ष संजयराज हलगरकर यांनी केले आहे.

### विजेचा धक्का लागून खासगी लाईनमनचा मृत्यू:निवळी ग्रामस्थांचे वीज उपकेंद्रासमोर आंदोलन

**मुरूड :** निवळी (ता लातूर) येथील शेतातील ३३ केव्ही उच्चदाबाच्या वीजवाहिनीच्या पोलवर काम करताना एका तरुणाचा विजेचा धक्का लागून दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना बुधवार सायंकाळी पाच वाजेदरम्यान निवळी शिवारात घडली. दरम्यान तरुणाच्या मृत्यूनंतर ग्रामस्थांनी निवळी सबस्टेशनसमोर ठिय्या आंदोलन करत मृताच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याची मागणी केली.



अजित संजय मस्के (वय ३०) असे मयत तरुणाचे नाव आहे. तो खाजगी लाईनमन म्हणून काम करत होता. बुधवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मयत मस्के हा निवळी येथील एका शेतकऱ्याच्या शेतातील विद्युत पोललगतची स्टे काढण्यासाठी वीजपुरवठा सुरू असलेल्या लाईनच्या पोलवर चढला होता. पोलवर चढून काम करत असताना अचानक विद्युत प्रवाह सुरू झाल्याने त्याला तीव्र विद्युत धक्का बसला. उच्चदाबाच्या प्रवाहामुळे तो खाली कोसळले . उपचारासाठी त्याला तात्काळ लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. त्यांच्या मृत मस्के याच्या मागे आई-वडील, पत्नी व एक लहान मुलगा आहे.दरम्यान गुरुवारी सकाळी मयताच्या कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी, या मागणीसाठी ग्रामस्थांनी निवळी सबस्टेशनसमोर मयत तरुणाचे मृतदेह ठेवून ठिय्या आंदोलन करत रास्ता रोको केला. पोलिसांच्या मध्यस्थीने महावितरण कर्मचाऱ्यांकडून दोन लाख रुपये, संबंधित शेतकऱ्याकडून एक लाख रुपये व पुढील मदतीचे आश्र्वासन देण्यात आल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

# एकदिवसीय बाल हक्क व बाल सुरक्षा प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर , दि. २७ फेब्रुवारी :** बालकांच्या हक्कांचे संरक्षण, सुरक्षा व सशक्तीकरण यासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या बालरक्षा अभियान २०२५ अंतर्गत अहमदपूर येथे एकदिवसीय बालरक्षा प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. सदर कार्यशाळेचे आयोजन डॉ. एस. एस. एम. प्रतिष्ठानचे अध्यापक महाविद्यालय, आंबेजोगाई रोड, अहमदपूर येथे करण्यात आले.

सदरील कार्यशाळेस अहमदपूर तालुक्यातील विविध केंद्रांमधून प्रत्येकी तीन शिक्षक अशा एकूण ५० शिक्षकांची उपस्थिती लाभली. बालकांवरील अत्याचार, शोषण, दुर्लक्ष, बालविवाह, बालमजुरी, प्रोस्को कायदा यांसारख्या संवेदनशील विषयांवर सखोल मार्गदर्शन चाइल्ड हेल्पलाइन चे समन्वयक बापू सूर्यवंशी यांनी केले.तसेच शाळा स्तरावर बालसुरक्षा समितीची प्रभावी अंमलबजावणी, बालकांचे हक्क,कायदे व संरक्षण यंत्रणा याबाबत विस्तृत माहिती देण्यात आली.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी सन्माननीय केंद्रप्रमुख लक्ष्मण चोले, प्रमुख पाहुणे चाइल्ड हेल्पलाइन चे लातूर जिल्हा समन्वयक बापू सूर्यवंशी यांची उपस्थिती होते. प्रशिक्षण विभाग प्रमुख तथा गट साधन व्यक्ती संभाजी कांबळे यांनी बालसंरक्षण विषयक कायदे, तक्रार नोंदणी प्रक्रिया व आपत्कालीन सहाय्य याबाबत मार्गदर्शन केले.



सदरील कार्यशाळेत गट साधन व्यक्ती राम चामे, श्रीमती मनिषा गुणाले, श्रीमती इंदुमती जोगदंड यांनी विविध प्रात्यक्षिके, गटचर्चा व प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून शिक्षकांना प्रशिक्षण दिले. केंद्रीय मुख्याध्यापक दत्तात्रय गुरमे, राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त कलाशिक्षक महादेव खळुरे,सूर्यकांत बोईनवाड यांच्यासह अहमदपूर तालुक्यातील केंद्रांतील सर्व शिक्षकांनी कार्यशाळेत सक्रिय सहभाग नोंदविला.

प्रशिक्षणादरम्यान बालकांशी संवेदनशीलतेने संवाद साधण्याचे तंत्र, संशयास्पद घटनांची नोंद व अहवाल देण्याची पद्धत, तसेच शाळा परिसरात सुरक्षित वातावरण निर्मिती यावर भर देण्यात आला. सहभागी शिक्षकांनी कार्यशाळा अत्यंत उपयुक्त व मार्गदर्शक ठरल्याची भावना व्यक्त केली. कार्यशाळा संपल्यानंतर कला शिक्षक महादेव खळुरे व श्रीमती नादरगे यांनी प्रशिक्षण बाबतीत मनोगत व्यक्त केले.

कार्यशाळेची प्रास्ताविक राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक सूर्यकांत बोईनवाड तर आभार गट साधन व्यक्ती राम चामे यांनी मानले.

या उपक्रमामुळे तालुक्यातील शाळांमध्ये बालसुरक्षेची जाणीव अधिक बळकट होऊन बालहक्क संरक्षणाची चळवळ अधिक व्यापक होईल,असा विश्र्वास गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकाडे यांनी व्यक्त केले.

## डिजिटल मार्केटिंगद्वारे युवकांनी स्वावलंबी बनावे: डॉ. स्वामी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २७ फेब्रुवारी :** आजच्या डिजिटल युगात केवळ पदवी पुरेशी नसून, विद्यार्थ्यांनी तांत्रिक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. शॉपीफाय,कॅन्वा आणि व्हिक्स यांसारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करून विद्यार्थी स्वतःचे ऑनलाइन स्टोअर सुरू करू शकतात, असे विचार जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयाचे कार्यालय प्रमुख डॉ. रामेश्वर स्वामी यांनी व्यक्त केले.

भारत शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (रासेयो) विभागाचे विशेष वार्षिक शिबिर जमालपूर येथे संपन्न झाले. १९ ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत शाश्र्वत विकासासाठी युवक: जलसंधारण आणि ओसाड भूमी विकास या संकल्पनेवर हे शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिराच्या चौथ्या दिवशी कॉमर्स आणि डिजिटल मार्केटिंग या विषयावर विशेष व्याख्यान पार पडले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. शिवराज बाजुळगे होते. व्यासपीठावर रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. केशव आलगुले, डॉ. गीता वाघमारे आणि प्रा. प्रज्ञो कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात ग्रामस्वच्छता, जलसंधारण आणि सामाजिक जनजागृतीचे विविध उपक्रम राबवण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. एस. बी. शेख यांच्यासह स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

जमालपूरमध्ये रासेयोचे श्रमसंस्कार सात दिवसीय शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी केवळ वैचारिक प्रबोधनच घेतले नाही, तर प्रत्यक्ष श्रमदानातून गावकऱ्यांसमोर आदर्श ठेवला. जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकासासाठी विद्यार्थ्यांनी राबवलेल्या उपक्रमांचे ग्रामस्थांनी कौतुक केले.

## मानवी जीवनाची उकल करणारा ग्रंथ म्हणजे कठोपनिषद होय : डॉ. नरेंद्र शिंदे

**तभा वृत्तसेवा**

**उदगीर, दि. २७ फेब्रुवारी :** भारतीय संस्कृती ही विज्ञानाधिष्ठित गुरु-शिष्य परंपरेवर आधारित आहे. येथे ज्ञानपरंपरेला अति महत्व असून आत्मा, परमात्मा आणि ब्रह्म यांची जाणीव होते. उपनिषदामध्ये सांगितलेले जीवनाचे श्रेय व प्रेय मार्ग या संदर्भाने यमाचार्य आणि नचिकेता या गुरु शिष्यांमधील संवादाच्या माध्यमातून मानवी जीवनाची उकल करणारा ग्रंथ म्हणजे कठोपनिषद होय. असे मत डॉ. नरेंद्र शिंदे यांनी व्यक्त केले.

पंधरा वर्षापासून अखंडितपणे चालू असलेल्या चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत श्रीराम चामले यांच्या अध्यतेखाली संपन्न झालेल्या वाचक संवादचे ३५५ वे पुष्प संस्कृतचार्य प्रा. डॉ. नरेंद्र शिंदे यांनी अज्ञात ऋषींकृत कठोपनिषद या ग्रंथावर बोलताना म्हणाले की आत्मा-बुद्धी-मन- ज्ञानेन्द्रिय यांची सत्कार्ये, दानधर्म पाप-पुण्य, सुख-दुःख, कर्मकांड-वृत्ती या सर्वांची कारणे या ग्रंथात सविस्तरपणे मांडलेली असून स्वर्ग-नरक, जप-तप, यज्ञ-साधना यांची साधने आणि अंतिम सत्य सांगतानाच यज्ञ म्हणजे काय त्याची प्रक्रिया आणि ते विज्ञानाशी कसे निगडित आहे याबद्दल सविस्तर मांडणी या ग्रंथात केलेली आहे.

अत्यंत प्रभावी संवादानंतर झालेल्या चर्चेत अनेकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी उपस्थितांना जन्मदिनाची ग्रंथ भेट




देण्यात आली. शेवटी अध्यक्षीय समारोपात श्रीराम चामले म्हणाले की सर्वांसाठी अत्यंत उपयोगी असणारा हा वाचक संवाद याचा लाभ जास्तीत ज्यास्त लोकांनी घ्यावा.

शासकीय दूध डेअरीच्या सभागृहात संपन्न झालेल्या या अत्यंत प्रभावी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संयोजक अनंत कदम यांनी केले तर आभार प्रा. सुरेश शिंदे बेंबरेकर यांनी मानले.

## पंचायत समिती लिपिकांचे कामबंद आंदोलन; नागरिकांची फरफट; रिकाम्या खुर्च्या अन् कार्यालयात शुकशुकाट

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट , दि. २७ फेब्रुवारी :** महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतील लिपिक संवर्गाच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे जळकोट येथील पंचायत समिती लिपिकांनी २३ फेब्रुवारीपासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे. याचा फटका जळकोट तालुक्यातील नागरिकांना फटका बसत असून कार्यालयातील कामे ठप्प झाले आहेत. दरम्यान पंचायत समिती , कार्यालयात शुकशुकाट दिसून येत आहे. आंदोलनात जळकोट तालुक्यातील एकूण २१ लिपिक कर्मचारी सहभागी झाले आहेत.



लिपिक संवर्ग हा प्रशासनाचा कणा मानला जातो. चौथ्या वेतन आयोगापासून वेतनश्रेणीत असलेली तफावत दूर करून सुधारीत वेतनश्रेणी लागू करावी, पदोन्नती स्तर कमी करून पदनामात बदल करावा, जुनी पेन्शन योजना जशीच्या तशी लागू करावी, तसेच १ नोव्हेंबर २००५ पूर्वी अनुकंपा नियुक्तीसाठी प्रतीक्षायादीत असलेल्या सर्वांना न्याय द्यावा, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येत आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे. या पूर्वी वेळोवेळी निवेदन देवून काहीच निर्णय होत नसल्याने दिनांक १६ फेब्रुवारी पासून आंदोलन सुरू करण्यात आले होते. मात्र, मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्याने अखेर लिपिक संवर्गाने बेमुदत कामबंद आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, पुढील काळात कार्यालयीन कामकाज प्रलंबित राहिल्यास त्यास जिल्ह्यातील लिपिक संवर्ग कर्मचारी व अधिकारी जबाबदार राहणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. पंचायत समिती कार्यालयाचे निवेदनही सोबत जोडण्यात आले आहे. या आंदोलनामुळे पंचायत समितीच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून विविध प्रशासकीय सेवा उशिरा मिळण्याची भीती व्यक्त होत आहे. शासनाने तातडीने दखल घेऊन तोडगा काढावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे. या आंदोलनात , तालुकास्तरीय संघटनेचे तालुकाध्यक्ष : श्री पांचाळ निखिल उपाध्यक्ष श्री ढोबळे लक्ष्मण सचिव श्री शेख मेनोद्दीन मो. सहसचिव पाटील अरविंद .कोषाध्यक्ष आकुलवाड राजाराम सहकोषाध्यक्ष .केंद्रे संभाजी .संघटक श्री तोडसाम सुनिल प्रसिध्दी श्रृंगारे आनंद .महिला प्रतिनिधी श्रीमती स्वामी . राजश्री श्रीमती चव्हाण . विद्या सदस्य सुर्यवंशी पांडुरंग घोरपडे संजय कासनाळे शांतवीर . डंबाळे सोमेश्र्वर ,नागरगोजे शिवाजी, जायेवार दत्ता, बुरकुले टी आर, उर्मिला केंद्रे ,सुयवंशी श्रीरंग आबादास ,मुस्कावाड एन डी सह कोषध्यक्ष पेन्शनवार एस सी आदी कर्मचारी पदाधिकारी सहभागी झाले आहेत.

## मदर तेरेसा प्रायमरी इंग्लिश स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात



**तभा वृत्तसेवा**

**कासार शिरसी, दि. २७ फेब्रुवारी :** निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील मदर तेरेसा प्रायमरी इंग्लिश स्कूल चे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरे करण्यात आले. या स्नेहसंमेलनाची सुरुवात सरस्वती प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या स्नेहसंमेलनात मदर तेरेसा स्कूलच्या अनेक चिमुकल्यांनी सहभाग घेऊन वेगवेगळ्या वेशभूषेत आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. यात भावगीत, भक्तीगीत, देशभक्तीपर गीत, लावणी, व विविध भगातील संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या गीतांवर बहारदार नृत्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली. यातील 'आय लव माय इंडिया', सुंदरी सुंदरी', शिवनेरीवर शिवबा जन्मला या सारख्या गीतावरिल चिमुकल्यांच्या नृत्याला उपस्थित प्रेक्षकांनी व मान्यवरांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

या स्नेहसंमेलना प्रसंगी व्यासपीठावर कासार शिरसी जी.प. गटाचे नूतन सदस्य उमेश उमापुरे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे अध्यक्ष शिवकुमार चिंचनसुरे,पंचायत समिती सदस्य विवेक कोकणे, सपोनि प्रवीण राठोड, सोसायटी चेअरमन गुरुनाथ मेलगीरे, व्हाईस चेअरमन ओम चिंचनसुरे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष बाळूमामा वेल्हाळ,मराठा संघाचे संदीप पाटील, वंचितचे स्वप्नील सूर्यवंशी, पोलीस बालाजी जाधव, श्रीहरी डावरगावे, पालक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक ज्ञानेश्र्वर मडोळे,अनिल जगताप, आकाश गायकवाड,संगिता गायकवाड, रंजना सूर्यवंशी, पल्लवी उमापुरे, वैष्णवी आकडे, कोमल पांचाळ, विद्या बरकंबे, संध्या जाधव, संध्या गायकवाड, मल्लु बिराजदार, ज्ञानेश्वर मोरडे, अंबादास दगदाडे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी बिराजदार कोराळीकर यांनी केले.

# औसा बाजार समितीच्या विस्तारीकरणाला गती

## आ.अभिमन्यू पवार यांच्या मागणीवरून जिल्हाधिकाऱ्यांची निर्णायक बैठक

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. २७ फेब्रुवारी :** औसा शहरासह तालुक्याच्या कृषी विकासाला चालना देणाऱ्या औसा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विस्तारीकरणाच्या मागणीला अखेर वेग आला आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या पाठपुराव्यानंतर लातूरच्या जिल्हाधिकारी सौ. वर्षा ठाकूर घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक सं झाली. या बैठकीत बाजार समितीच्या विस्तारीकरणासंदर्भातील विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.




औसा शहरातील मुख्य बाजाराच्या विस्तारीकरणासाठी बाजारालगत औसा शहर विकास आराखड्यात आरक्षित असलेली जमीन बाजार समितीस उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली. तसेच किल्लारी उपबाजार समितीच्या विस्तारीकरणासाठी भूकंप पुनर्वसन योजनेअंतर्गत किल्लारी विकास आराखड्यातील आरक्षित जमीन उपलब्ध करून देण्याबाबतही निर्णय प्रक्रिया गतीमान करण्याचे निर्देश देण्यात आले. नव्याने प्रस्तावित उजनी बाजार उपसमितीसाठी गायरान जमिनीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही तात्काळ सुरू करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी या बैठकीदरम्यान दिल्या आहेत.

यावेळी अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेल्या नुकसानीची गंभीर दखल घेण्यात आली. नुकसानग्रस्त क्षेत्रांचे तातडीने पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे आदेश संबंधित यंत्रणांना देण्यात आले. किल्लारी येथील श्री निळकंठेश्र्वर देवस्थानाला गावठाणातील उपलब्ध करून दिलेल्या जमिनीचे आरक्षण बदलण्याबाबतचा प्रस्ताव, नदी हत्तरगा गावठाणातील प्लॉट वाटपाचा प्रश्न, सारणी येथील गायरान जमिनीवरील घरांचे नियमितीकरण तसेच वांगजी हे संपूर्ण गाव गावठाण म्हणून घोषित करण्याबाबतचे विषयही बैठकीत सकारात्मकरीत्या चर्चिले गेले.

या बैठकीमुळे औसा कृषी, बाजार समितीची व्यवस्था आणि स्थानिक विकासाशी संबंधित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार आहे.यामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाच्या पुढाकारामुळे विस्तारीकरणाच्या कामांना लवकरच प्रत्यक्ष सुरुवात होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या बैठकीला बाजार समितीचे सभापती चंद्रशेखर सोनवणे, औसा- रेणापूर उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे आदीसह विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अमेरिकेतील शिक्षण संस्थेत परभणीच्या युवकाचे अडकलेले पाच लाख रुपये परभणी पोलिसांच्या मदतीने परत

## सायबर पोलिस ठाण्याचीय यशस्वी कामगिरी : हायब्रीड शिक्षणाचे नावाखाली केली सवेगिरी!

**परभणी ,/प्रतिनिधी-** अमेरिकेतील शिक्षण संस्थेत परभणीच्या युवकाचे अडकलेले ५ लाख रुपये परभणी पोलिसांच्या मदतीने परत सायबर पोलिस ठाण्याचीय यशस्वी कामगिरी : हायब्रीड शिक्षणाचे नावाखाली केली फसवेगिरी उघड झाली आहे.

अमेरिकेतील एका शिक्षण संस्थेत परभणीतील एका युवकाचे अडकलेले पाच लाख रुपये परभणी सायबर पोलिसांच्या यशस्वी कामगिरीमुळे परत मिळाले.

या संदर्भात सविस्तर माहिती अशी, शहरातील काद्राबाद प्लॉट परिसरातील सय्यद आसिम रऊफ यांनी डिसेंबर २०२४ मध्ये अमेरिका (यूएसए) येथील केन्सेस राज्य मेसुरी येथे एम. एस. बिझनेस अनेलेटीक्सचे शिक्षण घेण्यासाठी एडवाय या कन्सलटन्सीचे मार्फत अर्ज केला होता. याकरीता त्यांनी ५ हजार यूएस डॉलर (४ लाख ३३ हजार रूपये) ऑनलाईन पध्दतीने पाठविले होते. हे पैसे त्यांनी एडवाय या कन्सलटन्सीचे मार्फत प्राप्त झालेल्या लिंक द्वारे अविला युनिर्वसिटी केन्सेस राज्य मेसुरी यांच्या बँक खात्यावर पाठविले होते ही रक्कम सय्यद आसिम यांच्या खात्यावरुन विद्यापीठाच्या खात्यावर वर्ग झाली होती. दरम्यान ही प्रक्रिया होत असतांना कन्सलटन्सीने कोणतेही काम केले नाही. या संदर्भात त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून त्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती घेतली. कन्सलटन्सी ज्या महाविद्यालयात सय्यद आसिम यांना प्रवेश देण्याच इच्छुक होती त्या महाविद्यालयात त्यांना प्रवेश नको होता. यावरून आसिम यांनी प्रवेशासाठी पाठवलेली रक्कम परत देण्याची मागणी केली असता त्यांनी रिटर्न फ्लाईट तिकीटाची माहिती विचारून त्याचवेळी तुमचे पैसे तुमच्या खात्यात परत देतो असे सांगितले. त्यांनी सर्व प्रक्रिया करूनही त्यांना पैसे परत मिळाले नव्हते. त्यानंतर तीन महिने त्यांनी पाठपुरावा केला. शेवटी एप्रिल २०२५ मध्ये सय्यद आसिम यांनी सर्व कागदपत्रांसह या संदर्भात शहरातील पोलीस अधीक्षक कार्यालयातील सायबर सेलकडे तक्रार केली. ही तक्रार प्राप्त झाल्यानंतर सायबर सेलचे पोलीस निरीक्षक बुध्दीराज सुकाळे,पोउपनि आदित्य लाकुळे व सायबर सेलचे पथकाने सबंधीत कन्सलटन्सीकडे वारंवार पाठपुरावा केला या प्रकरणाची माहिती देत दाखल तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कारवाईबद्दल सांगून विद्यार्थ्यांचे पैसे परत करण्यास सांगितले. यावर सुरूवातील कोणतेही उत्तर न देणाऱ्या कन्सलटन्सीने काही दिवसांपूर्वी पैसे परत मिळतील असे आश्वासन दिले. विद्यापीठाकडून या संदर्भात कोणतीही कारवाई न झाल्याने शेवटी कन्सलटन्सीने विद्यार्थ्यांचे पाच हजार डॉलर परत केले आहेत. सायबर सेलकडून तांत्रिक पुराव्याच्या सहाय्याने करण्यात आलेल्या कारवाईने सदर पैसे परत मिळाले आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर सेलचे पोलीस निरीक्षक बुध्दीराज सुकाळे व त्यांचे पथक पोउपनि आदित्य लाकुळे सह अंमलदार बालाजी रेड्डी, पोलीस हेड कॉन्स्टेबल गणेश कौटकर, मोहम्मद शारेख, स्वप्नील पोतदार, सय्यद हिना, रजवी मुर्तुजा यांनी केली.

## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा परिषद व पंचायत समितीतही स्विकृत सदस्यांच्या निवडी संदर्भातील निर्णयाकडे राजकीय वर्तूळाचे लक्ष केंद्रीत

**परभणी,/प्रतिनिधी:-** मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पाठोपाठ पंचायत समितीतसुध्दा नगरपालिका व महानगरपालिकांप्रमाणे स्विकृत सदस्यांच्या निवडी संदर्भात राज्य सरकारने उचललेल्या सकारात्मक पावलांमुळे राजकीय वर्तूळाचे अंतीम निर्णयाकडे लक्ष केंद्रीत झाले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नगरपालिका व महापालिकेत स्विकृत सदस्य निवडले जातात. त्याच पार्श्वभूमीवर मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीतसुध्दा स्विकृत सदस्य असावेत, असा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन होता. त्या संदर्भात सरकारने विविध स्तरावर विचार विनिमय केला. विशेषतः जिल्हा परिषदांमध्ये एकूण जागेच्या १० टक्के व पंचायत समितीत एकूण जागेच्या २० टक्के असे स्विकृत सदस्य निवडले जावेत, जास्तीत जास्त ५ सदस्य असावेत, असा विचार विनिमयाअंती प्रस्ताव समोर आला. या प्रस्तावामुळे प्रत्येक राजकीय पक्षातील कर्तव्यनिष्ठ व एकनिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेत प्रामुख्याने संधी उपलब्ध होईल, असा उदात्त हेतू व्यक्त झाला. या पार्श्वभूमीवरच आता या निवडी संदर्भात राज्य सरकारद्वारे लवकरच निर्णय होईल व ग्रामविकास मंत्रालयाद्वारे या निवड प्रक्रिये संदर्भात लवकरात लवकर अधिसूचना निघेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### स्वातंत्र्यवीर सावरकर यांना आत्मार्पण दिवसानिमित्त अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी :** स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांना गुरुवारी (दि.२६) आत्मार्पण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

स्वातंत्र्यवीर सावरकर व स्वातंत्र्यवीर सावरकर साहित्य अभ्यास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्या नगर भागातील स्वातंत्र्यवीर सावरकर मार्गावरील सावरकर यांच्या पुतळ्याजवळ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यावेळी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले व सामुहीक जयस्तुते हे गीत म्हणण्यात आले. वंदे मातरम्ने कार्यक्रमाचा समारोप झाला. यावेळी सावरकर प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कार आणि दुचाकीच्या धडकेत एक व्यक्ती गंभीर जखमी : उमरी फाट्यावरील घटना

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ते गंगाखेड महामार्गावरील उमरी फाट्याजवळ गुरुवारी सायंकाळी साडे सहा वाजेच्या सुमारास कार आणि मोटारसायकलच्या धडकेत एक युवक गंभीर जखमी झाला.

एम.एच.११ ई.डब्लू. ९७४० या क्रमांकाची कार परभणीहुन मांडाखळीकडे जात होती. तर एम.एच. २२ डब्लू. ९०२१ या क्रमांकाची मोटारसायकल परभणीच्या दिशेने जात होती. त्या दोन्ही वाहनांची समोरासमोर जोरदार धडक झाली. त्यात दुचाकीवरील दत्ता गिराम (रा.ब्रम्हपुरी) हा युवक जखमी झाला. प्रत्यक्षदर्शनींनी तात्काळ या युवकास परभणी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. या युवकाची प्रकृती स्थिर आहे.

### सेलूतील महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यासाठीच्या राखीव जागेवरील बांधकाम थांबविण्याची मागणी

**परभणी,/प्रतिनिधी :** सेलू येथील सर्व्हे नंबर ५५७ मधील महाराणा प्रताप यांच्या नियोजित पुतळ्याकरीता महापालिका प्रशासनानेच राखीव ठेवलेल्या जागेवर पालिकेनेच अन्य विकास कामे सुरु केल्याबद्दल संतप्त नागरीकांनी ही कामे तात्काळ थांबवावी, अशी मागणी केली. नगरसेवक कपील फुलारी, प्रशास ठाकूर, बंडु देवधर, पवन घुमरे, कृष्णा चव्हाण, व्यंकटेश भिसे, संजय भाग्यवंत, सुनील चव्हाण, राजू चव्हाण, शिवशंकर राऊत, अर्जून चव्हाण, बालाजी वडे, राहुल जाधव, काना शर्मा आदींनी मुख्याधिकाऱ्यांना एक निवेदन सादर केले. त्याद्वारे त्या राखीव जागेवरील काम तात्काळ थांबवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. गेल्या २० वर्षांपासून या ठिकाणी सातत्याने महाराणा प्रताप यांच्या जयंती आणि पुण्यतिथी निमित्ताने कार्यक्रम होत आले आहेत. नियोजित पुतळ्याकरीता राखीव असणाऱ्या या जागेवर प्रशासनानेच कोणत्याही सार्वजनिक सूचना, हरकती न मागविता विकास कामे सुरु केल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले. या प्रकरणात प्रशासनाने तात्काळ कामे थांबवावीत, अन्यथा लोकशाही पध्दतीने आंदोलन उभारले जाईल, असा इशारा संतप्त नागरीकांनी दिला.

### भारताची राज्यघटना जगात अद्वितीय : प्राचार्य डॉ. अनिल सिंगारे

**परभणी,/प्रतिनिधी :** भारताची राज्यघटना ही जगात अद्वितीय अशी आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. अनिल सिंगारे यांनी केले.

येथील शारदा महाविद्यालयात स्वारातिम विद्यापीठ व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेअंतर्गत 'भारतीय संविधान निर्मिती' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बबन पवार होते, तर प्रमुख अतिथी म्हणून ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल सिंगारे उपस्थित होते. व्यासपीठावर हिंगोली येथील संजय जाधव, उपप्राचार्य डॉ. श्यामसुंदर वाघमारे व कार्यालय प्रमुख सुरेश जयपूरकर यांची उपस्थिती होती.

प्रमुख वक्ते डॉ. अनिल सिंगारे यांनी भारतीय संविधान निर्मितीचा इतिहास सविस्तर उलगडून सांगितला. संविधान सभेत सर्व घटकांचे प्रतिनिधित्व राहील याची घेतलेली काळजी, महिलांना स्थान देण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय आणि कलम ३५६ सारख्या महत्त्वपूर्ण तरतुदींचा देशाच्या एकात्मतेसाठी असलेला उपयोग यावर त्यांनी प्रकाश टाकला. विविधता असूनही भारत आज अखंड व सक्षम राष्ट्र म्हणून उभा आहे, यामागे राज्यघटनेतील दूरदृष्टी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच संविधान निर्मितीची प्रक्रिया, सदस्यांची निवड, खर्च, लेखनकार्य ते २६ जानेवारी १९५० रोजी अंमलबजावणीपर्यंतचा प्रवास त्यांनी सोप्या भाषेत विद्यार्थ्यांसमोर मांडला.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. पवार यांनी बी. आर. आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव करत विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करून त्यातून प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सचिन खडके यांनी केले. प्रास्ताविक व प्रमुख वक्त्यांचा परिचय प्रा. डॉ. नितीन बावळे यांनी करून दिला, तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. ज्ञानोबा मुंढे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. प्रकाश काळे, डॉ. श्रीधर पांढरकर, राजाराम मुत्रटकर, तनुजा रासवे, विश्वनाथ खेडकर, तुकाराम पवार, भगवान रिठाड, सुनंदा राजगुरू, संतोष एडके व नसिरुद्दीन काजी यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्यक्तिनिर्मितीची प्रक्रिया म्हणजे संघ - शरदराव हेबाळकर

**परभणी,/प्रतिनिधी:** परकीय सत्ता उलथवून टाकण्यासाठी, असंघटित हिंदूंना संघटीत करण्याच्या कल्पनेतून सन १९२५ साली विजयादशमीच्या मुहूर्तावर डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी मोजक्या मित्रांना घरी बोलावून संघाची स्थापना केली. संघ म्हणजे कोणालाही विरोध नसून, संस्कारक्षम माणूस निर्माण करणे तथा व्यक्तीनिर्मितीची प्रक्रिया म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ असल्याचे प्रतिपादन संघाचे गाढे अभ्यासक डॉ.शरदराव हेबाळकर यांनी केले आहे.

ते येथील स्व.जनुभाऊ रानडे व्याख्यानमालेतील 'संघ शताब्दी-कार्य आणि जबाबदारी' या विषयावरील दुसरे पुष्पगुंफताना मंगळवार २४ फेब्रुवारी रोजी नूतन विद्यालय सभागृहात बोलत होते. यावेळी देवगिरी नागरी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे, विवेकानंद विद्यालय स्थानिक कार्यकारणी अध्यक्ष हरिभाऊ चौधरी, सचिव उपेंद्र बेलूरकर, देवगिरी बँकेचे शाखा व्यवस्थापक विश्वास देव आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना शरदराव हेबाळकर म्हणाली की, हजारो वर्षांपूर्वी वेदांमधील ऋषीमुनींनी सबंध विश्वातील संबंध मानव जातीसाठी एक घोषणा केली होती. पुढे बोलताना शरदराव हेबाळकर म्हणाली की, हजारो वर्षांपूर्वी वेदांमधील ऋषीमुनींनी सबंध विश्वातील संबंध मानव जातीसाठी एक घोषणा केली होती. त्यात विश्वातील संपूर्ण जातींना अमृत पुत्र म्हटले होते. आम्हाला स्वतःची जात, धर्म आणि महत्त्वकांक्षा नाही. आम्ही सर्वजण अशा ऋषीमुनींचे संतान आहोत की, ज्यांनी जगाला एकच मानले आहे. हजारो वर्षांच्या या तत्त्वज्ञानाशी पूर्वजांशी व संस्कृतीशी आम्ही जोडलेले आहोत. त्यामुळे आम्ही सर्व संघटित असणे गरजेचे आहे.

## पालम गट शिक्षणाधिकारी कार्यालयाचा अंधाधुंद कारभारामुळे ग्रामीण भागातील शाळा बंद पाडण्याचा प्रयत्न

**पालम/प्रतिनिधी - :** पालम येथे कार्यरत असलेले गटशिक्षणा अधिकारी कार्यालय हे दिवसेंदिवस ग्रामीण भागातील शाळा कशा प्रकारे बंद पाडता येतील याचा विचार करून काम करत असल्याचे दिसून येत आहे एकीकडे ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलांना सरकारी शाळेत शिकण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या योजनांची अंमलबजावणी करून प्रोत्साहित करण्याचे काम करत आहे तर दुसरीकडे शासनाच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी तालुका पातळीवर पंचायत समिती अंतर्गत गटशिक्षणाधिकारी कार्यालय कार्यरत असते या कार्यालयाच्या माध्यमातून शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या वेगवेगळ्या सूचनांचे पालन करणे व शैक्षणिक दर्जा उंचावणे यावर काम केले जाते पण पालम येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालय हे शासकीय नियमानुसार काम न करता मनमानी पद्धतीने काम करत आहे एखाद्या शाळांनी दिलेली योग्य पद्धतीची माहिती ऑनलाईन पद्धतीने न भरता त्याच्यामध्ये काही तांत्रिक चुका करून सर्व चुकांची जबाबदारी ही शाळांवर ढकलत ग्रामीण भागातील शाळांमध्ये कार्यरत



असलेल्या शिक्षकांची संख्या कमी करण्याचे षडयंत्र रचून गोरगरिबांच्या मुलांच्या हक्काचे शिक्षण व त्यांच्या अधिकारापासून ते कसे वंचित राहतील याचा प्रयत्न केला जात आहे कधी चांगल्याप्रकारे ज्ञानार्जन करणाऱ्या शिक्षकांना ज्ञानार्जन याऐवजी अन्य कामे सोपवून शाळेपासून दूर ठेवले जात आहे त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळत नाही हा ठपका ठेवून पालक सुद्धा खाजगी शाळेकडे आकर्षित होत आहेत या सर्व प्रकारामुळे खेडेगावात असलेल्या सरकारी शाळा बंद पडत असल्यामुळे यासाठी पालम येथील गटशिक्षणाधिकारी व त्या कार्यालयातील कर्मचारी यांच्या वतीने करण्यात येणारी मनमानी व अंधाधुंद कारोबार हा कारणीभुत ठरत आहे जे काही शिक्षक या कार्यालयाची मर्जी सांभाळतात त्यांना एक वागणूक दिली जाते तर जे शिक्षक विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून सदैव तत्पर राहून आपले कर्तव्य योग्य रित्या पार पाडतात त्यांना वेगळी वागणूक दिली जात आहे हा सर्व प्रकार पाहता हे कार्यालय सुध्दा आपल्या मुळ मुद्दा सोडून जात असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे या बाबतीत वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधी यांनी दिले.

## शहरातील अवाजवी करवाढीला लगाम चतुर्थ वार्षिक कर आकारणी स्थगिती

**मानवत,/प्रतिनिधी :-** प्रशासकीय काळात मानवत नगर परिषदेत प्रशासकामार्फत करण्यात आलेली चतुर्थ वार्षिक मालमत्ता कर आकारणी प्रक्रिया सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय करणारी असल्याने ही प्रक्रिया नगरपरिषद स्तरावर तात्काळ स्थगित करण्याचा आणि त्यात मूलभूत सुधारणा करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव नवनिर्वाचित कार्यकारिणीने मंजूर केला. यासंदर्भात २७ फेब्रुवारी रोजी सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. उपनगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे गटनेते डॉ. अंकुश बालाजी लाड यांनी यासंदर्भात पुढाकार घेतला. तसेच व्यावसायिक मालमत्ता वरील दुप्पट कर आकारणी रद्द करून ती कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वार्षिक भाडे मूल्य ही वास्तववादी पातळीवर कमी केले जाणार आहे.

नगरपरिषद मानवत हद्दीतील चतुर्थ वार्षिक कर आकारणीसाठी प्रसिद्ध करण्यात आलेली प्रारूप यादी आणि त्याबाबतचा प्रशासकीय ठराव क्र. २९३ (दि. ०६/०२/२०२५) हा शहरातील आर्थिक परिस्थिती आणि वस्तुस्थितीशी विसंगत असल्याचे दिसून येत आहे. नगरपरिषदेमार्फत प्रसिद्ध करण्यात आलेली सन २०२६-२७ ते २०२९-३० या चतुर्थ वार्षिक कालावधीसाठी कर आकारणीची प्रारूप यादी शहराच्या भौगोलिक परिस्थितीशी आणि नागरिकांच्या आर्थिक क्षमतेशी विसंगत असल्याचे दिसून येत आहे. या प्रक्रियेमुळे जनसामान्यांमध्ये असंतोष असून, नगरपरिषद प्रशासनाने स्थानिक पातळीवरच या प्रक्रियेचा फेरविचार करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे सुधारित ठराव मंजूर करण्यात येत आहे:

मंजूर ठरावरील महत्त्वाचे मुद्दे:

१) सध्या सुरु असलेली चतुर्थ वार्षिक कर आकारणीची प्रक्रिया नगरपरिषद स्तरावर स्थगित करण्यात येत आहे. सुधारणा पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत कोणतीही अंतिम यादी प्रसिद्ध करण्यात येऊ नये.

२) झोन निश्चित करताना झालेल्या त्रुटी आर्थिक स्तरानुसार झोन निश्चीती करताना संबंधित एजन्सीने फेरसर्वेक्षण करावे.

३) करयोग्य मूल्यावर आकारलेला करदर हा क वर्ग नगरपरिषदेसाठी जास्त आहे. नागरिकांवरील बोजा या नवीन कर दराने कमी व्हावा.

४) व्यावसायिक मालमतांसाठी असलेली दुप्पट कर आकारणी रद्द करून ती निवासी दराच्या (दीडपट) करण्यात यावी.

५) वार्षिक भाडेमूल्याची गणना करताना सध्याचे बाजारभाव आणि मालमतेची स्थिती यांचा वस्तुनिष्ठ विचार करून त्यात कपात करण्यात यावी.

६) नगर परिषद प्रशासनाने प्रभागनिहाय विशेष शिबिरे आयोजित करावीत. प्रत्येक नागरिकाच्या हरकतीवर प्रत्यक्ष जागेवर जाऊन शहानिशा करावी आणि सुधारित दराने आकारणी करावी.

७) सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक संस्था, स्वातंत्र्य सैनिक व दिव्यांग यांना नियमानुसार योग्य ती करसवलत देण्याचे आदेश देण्यात येत आहेत.

## साखला प्लॉट येथील आरोग्य वर्धिनी केंद्राची महापौरांकडून पाहणी :

**परभणी,/प्रतिनिधी:** शहरातील साखला प्लॉट येथील महानगरपालिकेच्या आरोग्य वर्धिनी केंद्राला आज गुरुवार २६ फेब्रुवारी रोजी महापौर सय्यद इकबाल सय्यद खाजा यांनी भेट देत कामकाजाची सविस्तर पाहणी केली.

या पाहणीत केंद्रात दररोज तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या, लसीकरण मोहीम, गरोदर मातांना देण्यात येणाऱ्या सुविधा, विविध नोंदणी रजिस्टरची स्थिती तसेच केंद्राच्या आतील व बाहेरील परिसरातील स्वच्छतेचा आढावा घेण्यात आला. महापौरांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना परिसर स्वच्छ ठेवण्याच्या तसेच नागरिकांनी खासगी रुग्णालयांऐवजी शासकीय आरोग्य केंद्राकडे विश्वासाने यावे, यासाठी दर्जेदार आरोग्य सुविधा आणि सन्मानपूर्वक वागणूक देण्याच्या सूचना केल्या.

दरम्यान, आरोग्य केंद्राच्या परिसराची पाहणी करत असताना महापौरांना तेथे दारूच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्या. या प्रकाराची गांभीर्याने दखल घेत त्यांनी तात्काळ कोतवाली पोलीस स्टेशन येथे दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. संबंधित पोलीस निरीक्षकांना घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याच्या तसेच रुग्णालय परिसरात गैरवर्तन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

## महा ई-सेवा व आधार केंद्र चालकांचा ९ मार्चपासून आझाद मैदानावर धरणे आंदोलन

**परभणी ,/प्रतिनिधी:** राज्यातील महा ई-सेवा व आधार केंद्र चालकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी अखिल स्तरीय महा ई-सेवा व आधार केंद्र संघटन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने येत्या ९ मार्च रोजी मुंबईतील आझाद मैदान येथे धरणे आंदोलन करण्यात येणार असून, मागण्या मान्य न झाल्यास राज्यव्यापी कामबंद आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

एन. डी. धामणगावे, आदित्य बाकाळे, सचिन शेट्टी, अंगद सावंत, मोहम्मद इद्रीस, बालाप्रसाद डागा, बाबुराव मोरे आदींच्या शिष्टमंडळाने गुरुवारी याबाबतचे निवेदन जिल्हा प्रशासनास सादर केले. त्याद्वारे, शासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही तसेच न्यायालयीन याचिका दाखल करूनही ठोस निर्णय न झाल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

संघटनेने शासनासमोर १८ मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात केंद्रांची संख्या निश्चित करणे व अनावश्यक नवीन केंद्रांना परवानगी देणे थांबविणे, विविध योजनांचे थकीत कमिशन तात्काळ अदा करणे, दरमहा निश्चित मानधन व विमा संरक्षण लागू करणे, आधार प्रकल्पासाठी घेतलेली ५० हजार रुपयांची अनामत रक्कम परत करणे, तसेच कोणतीही पूर्वसूचना न देता केंद्र बंद किंवा ऑपरेटरला ब्लॅकलिस्ट करण्याची कारवाई थांबविणे, आदी मागण्यांचा समावेश आहे.

दरम्यान, संघटनेचे अध्यक्ष डॉ. अमर पवार व राज्य सचिव विनोद तायडे यांनी सांगितले की, महा ई-सेवा व आधार केंद्रांमुळे शासनाच्या डिजिटल सेवा ग्रामीण व शहरी भागात प्रभावीपणे पोहोचत आहेत. मात्र केंद्र चालकांना आर्थिक अडचणी, थकीत देयके आणि प्रशासकीय त्रास सहन करावा लागत आहे. ९ मार्चपर्यंत मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास राज्यभर कामबंद आंदोलन करण्यात येईल. या कालावधीत जनसेवा विस्कळीत झाल्यास त्याची जबाबदारी शासनाची राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

राज्यातील सर्व महा ई-सेवा व आधार केंद्र चालकांनी मोठ्या संख्येने मुंबई येथे उपस्थित राहून आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन संघटनेतर्फे करण्यात आले आहे.

## अग्रलेख...

# भारत-इस्रायल सहकार्याच्या नव्या दिशा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा इस्रायल दौरा हा दोन्ही देशांतील द्विपक्षीय संबंधांचा नवीन अध्याय आहे. नरेंद्र मोदी यांनी इस्रायलची संसद-नेसेटमध्ये भाषण करून इतिहास रचला. या पटलावर भाषण करणारे ते पहिलेच पंतप्रधान ठरले. याचे ऐतिहासिक महत्त्व औपचारिकतेपुरते नाही. ते भारत-इस्रायल संबंधांतील सकारात्मक बदल प्रतिबिंबित करणारे आहे. भाषणाची सुरुवातच भारत आणि इस्रायल या दोन प्राचीन संस्कृतींच्या सहकार्याच्या नव्या दिशा म्हणून करण्यात आली. धोरणात्मक संधीपेक्षा संस्कृती, इतिहास आणि सामाजिक मूल्ये यांच्या आधारे बांधलेले संबंध म्हणून हे सहकार्य मांडले गेले. आपण एका प्राचीन संस्कृतीचा प्रतिनिधी म्हणून बोलत असल्याचे आणि १.४ अब्ज लोकांच्या भारताच्या मैत्रीचा संदेश आपण येथे मांडत असल्याचे मोदींनी स्पष्ट केले. हा प्रारंभ भारताच्या परराष्ट्र धोरणातील नवी दिशा अधोरेखित करणारा आहे. पारंपरिक नीतिमूल्ये आणि जागतिक संवादादरम्यान संतुलन राखून आधुनिक इतिहासातील धोरणात्मक भागीदारीची ही स्थापना आहे. या माध्यमातून दहशतवाद आणि सुरक्षेवर एक स्पष्ट आणि ठाम संदेश देण्यात आला. भाषणाचा एक महत्त्वाचा भाग दहशतवादाविरुद्ध भारत आणि इस्रायल दोघांचेही शून्य सहिष्णुता धोरण असणे हा होता. कुठलेही कारण नागरिकांच्या हत्येला न्याय देऊ शकत नाही आणि दहशतवादाचे कोणत्याही स्वरूपात समर्थन केले जाऊ शकत नाही, यावर नरेंद्र मोदी यांनी भर दिला.

भारत आणि इस्रायल या दोन्ही देशांनी दहशतवादाच्या वेदना अनुभवल्या आहेत. मोदींनी ७ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या हमासच्या हल्ल्याचा तीव्र शब्दांत तीव्र निषेध केला. या हल्ल्यात मृत्यू झालेल्या प्रत्येक कुटुंबाच्या दुःखात भारत सहभागी आहे, असे त्यांनी सांगितले. या प्रकारे दहशतवादाबद्दल भारताची भूमिका फक्त प्रतिकारक स्वरूपाची नसून ती सामायिक तत्त्वांना आधार देणारी आणि वैश्विक शांती व सुरक्षिततेसाठी संयुक्त प्रयत्नांची गरज अधोरेखित करणारी आहे. मोदींनी गाझा शांतता उपक्रमाला भारताचे समर्थन दिले. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या माध्यमातून शांततेनेच स्थिरता निर्माण होऊ शकते आणि संघर्षाचे संभाव्य निराकरण संवादाच्या मार्गाने झाले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी घेतली. इस्रायलच्या संसदेत दिलेले नरेंद्र मोदी यांचे हे भाषण हा वैश्विक समतेचा आणि सहिष्णुतेचा संदेशही होता. तिथे भारताने इतर देशांशीही कायदेशीर व शांततामूलक मार्गाने चर्चा व संबंध वाढविण्यावर भर दिला. भारत फक्त एका देशाच्या बाजूने उभा राहणारा देश नाही; स्थिरतेसाठी जागतिक शांतता आणि न्याय्य शांती प्रक्रियेला समर्थन देणारे हे राष्ट्र आहे. मोदी यांनी भाषणात भारत-इस्रायलमधील संबंधांच्या विस्ताराची एक विस्तृत मांडणी केली. या भागीदारीने केवळ सामरिक सुरक्षा नव्हे तर व्यापार, तंत्रज्ञान, नवोन्मेष, कृषी आणि जलव्यवस्थापन यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये विकासाच्या वाटा प्रशस्त झाल्या आहेत. मोदींनी महायुद्धातील भारतीय सैनिकांच्या योगदानाचा उल्लेख करून सांगितले की, भारताचा इस्रायलशी असलेला संबंध केवळ आधुनिक राजनैतिक सहकार्याने नाही, तर इतिहास आणि बलिदानानेही निर्माण झालेला आहे. आधुनिक परराष्ट्र धोरणाला ऐतिहासिक आणि मानवी मूल्यांचा आधार असतो तेव्हा सांस्कृतिक संवाद निर्माण होतो. अशा संवादातून नातेसंबंध अधिक मानवी आणि सहानुभूतिपूर्ण बनतात. मोदींच्या भाषणातून तीन स्तरांचा धोरणात्मक संदेश स्पष्ट झाला. सुरक्षा आणि दहशतवादाविरुद्ध ठाम भूमिका हा भारताचा अनुभव आणि जागतिक जबाबदारीशी जोडणारा मुद्दा. या माध्यमातून व्यापक भागीदारीचा संदेशही देण्यात आला.

भारत आणि इस्रायल यांच्यातील संबंध गेल्या तीन दशकांत वेगाने दृढ झाले असून हे संबंध धोरणात्मक भागीदारीच्या समोर गेले आहेत. आता या सहकार्याचा जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात परिणाम होता आहे. भारत हा जगातील सर्वांत मोठ्या संरक्षण सामग्री आयातदार देशांपैकी एक आहे. दुसरीकडे इस्रायल हा अत्याधुनिक संरक्षण तंत्रज्ञानाचा अग्रगण्य पुरवठादार आहे. ड्रोन, क्षेपणास्त्रे संरक्षण प्रणाली, सायबर सुरक्षा, गुप्तचर तंत्रज्ञान अशा क्षेत्रांत दोन्ही देशांतील सहकार्य वाढले आहे. या सहकार्यामुळे भारताची लष्करी ताकद वाढली असून आशिया-प्रशांत आणि हिंद महासागर क्षेत्रातील शक्ती-संतुलनात बदल घडत आहेत. इस्रायलच्या तंत्रज्ञानामुळे भारताने सीमासुरक्षेत, दहशतवादविरोधी कारवायांत आणि आणि गुप्तचर व्यवस्थेतही मोठी झेप घेतली आहे. याचा परिणाम केवळ दक्षिण आशियातच नव्हे, तर दहशतवादविरोधातील जागतिक लढ्यावरही दिसून येतो. भारत-इस्रायल भागीदारीमुळे जागतिक शस्त्र बाजारात स्पर्धा निर्माण झाली आहे. अमेरिका आणि युरोपियन कंपन्यांनाही नव्या धोरणाचा विचार करावा लागत आहे. भारताचे पारंपरिक संबंध अरब देशांशी दृढ राहिले आहेत. तरीही इस्रायलशी वाढते संबंध कायम राखताना भारताने संतुलन राखण्याचे धोरण अवलंबिले आहे. विशेषतः सौदी अरब, संयुक्त अरब अमिरात आणि इराण यासारख्या देशांशी संबंध टिकवून ठेवताना इस्रायलशी जवळीक वाढविणे हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे कौशल्य दर्शविते. बहुध्रुवीय आंतरराष्ट्रीय संबंधांच्या धोरणामुळे भारताला पश्चिम आशियातील संघर्षामध्ये मध्यस्थीची भूमिका बजावण्याची संधी निर्माण झाली आहे. भारत आणि इस्रायल दहशतवाद्यांच्या निशाण्यावर असतात. आता गुप्तचर माहितीची देवाणघेवाण, तांत्रिक सहकार्य आणि संयुक्त प्रशिक्षण यामुळे जागतिक दहशतवादविरोधी मोहिमेला बळ मिळाले आहे. संयुक्त राष्ट्र संघात दहशतवादाच्या व्याख्येवर एकमत होण्यासाठी भारत-इस्रायल भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. या सहकार्यामुळे कट्टरवादी संघटनांविरुद्ध अधिक प्रभावी कारवाया करणे शक्य होणार आहे. भारत आणि इस्रायल यांच्यातील व्यापार सातत्याने वाढत आहे. संरक्षण क्षेत्रांव्यतिरिक्त हिरे, औषधनिर्मिती, आयटी, कृषी या क्षेत्रांतही सहकार्य वाढत आहे. या आर्थिक सहकार्यामुळे दोन्ही देश जागतिक पुरवठा साखळीतील महत्त्वाचे घटक बनत आहेत. विशेषतः तंत्रज्ञान आधारित उद्योगांमध्ये गुंतवणूक वाढल्यामुळे स्टार्टअप परिसंस्थेला चालना मिळत आहे. याचा सकारात्मक परिणाम जागतिक नवोन्मेष निर्देशांकावर दिसून येतोय. अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील घनिष्ठ संबंध लक्षात घेता, भारत जागतिक समीकरणातील महत्त्वाचा घटक ठरतो. भारत-प्रशांत धोरणात भारताचे वाढते महत्त्व आणि इस्रायलची तांत्रिक ताकद यामुळे त्रिपक्षीय सहकार्याच्या नव्या शक्यता निर्माण होत आहेत. यामुळे चीनसारख्या शक्तींना आवरण्याचे धोरण अधिक मजबूत झाले आहे. विशेषतः चीनच्या 'बेल्ट अॅण्ड रोड' उपक्रमाला पर्याय म्हणून भारत-इस्रायल-अमेरिका सहकार्याचे महत्त्व वाढले आहे. इस्रायलला 'स्टार्टअप नेशन' म्हणूनही ओळखले जाते. कृषी तंत्रज्ञान, जलव्यवस्थापन, सायबर सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता या क्षेत्रांत इस्रायल आघाडीवर आहे. भारत या तंत्रज्ञानाचा वापर शेती, जलसंधारण आणि डिजिटल सुरक्षेसाठी मोठ्या प्रमाणात करून घेत आहे. भारत आणि इस्रायल संबंधांमुळे पाकिस्तानवर अप्रत्यक्षपणे दबाव निर्माण झाला आहे. संरक्षण क्षेत्रातील तांत्रिक प्रगतीमुळे दक्षिण आशियातील सामरिक समीकरणे बदलत आहेत. त्यामुळे पाकिस्तानने चीनशी जवळीक अधिक वाढविली आहे. परिणामी, आशियात दोन वेगळे गट निर्माण होण्याची शक्यता आहे. इस्रायलने हेक्सॅगॉन अलायन्स हा आघाडीचा प्रस्ताव आणला आहे. त्यात इस्रायल, ग्रीस, सायप्रस, काही अरब देश, आफ्रिकी देश आणि आशियाई देशांचा समावेश आहे. हा प्रस्ताव जाहीर होताच पाकिस्तानने थयथयाट केला. हा मुस्लिम उम्माला धोका असल्याचा पाकिस्तानचा दावा आहे. एकूणच भारत आणि इस्रायलमधील भागीदारी केवळ द्विपक्षीय सहकार्य नसून ती बहुआयामी आणि जागतिक परिणाम करणारी आहे. संरक्षण, तंत्रज्ञान, दहशतवादविरोधी कारवाया, मध्यपूर्वेतील संतुलन आणि भारत-प्रशांत धोरण या सर्व क्षेत्रांत या संबंधांचा परिणाम जाणवतो. जागतिक शक्ती संतुलनात होत असलेल्या बदलांच्या पृष्ठभूमीवर भारत-इस्रायल भागीदारी भविष्यात अधिक निर्णायक ठरेल, यात कोणतेही दुमत नाही.

## प्रासंगिक

**प्रवीण टाके**

# चला... मराठीतच बोलू या!


### २७ फेब्रुवारी; मराठी भाषा गौरव दिन विशेष

मराठी भाषा हजारो वर्षांच्या इतिहासाने समृद्ध आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन नाही, तर आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक परंपरेचे आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. 'माय मराठी' या संकल्पनेत तिचे शुद्ध, प्रमाण आणि अभिजात रूप जितके महत्त्वाचे आहे, तितकेच विविध उपभाषांनी वाढविलेले तिचे वैविध्यही महत्त्वाचे आहे.

मराठी ही उपभाषांनी समृद्ध झालेली भारतातील एक प्रमुख भाषा आहे. मातृभाषा आपले अस्तित्व असते. बोलीभाषा माणसाची अस्मिता असते. प्रत्येक बोलीत तिचा वेगळा रंग, वेगळी लय आणि वेगळे चैतन्य तसेच लोकजीवनाचे प्रतिबिंब सामावलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना जगातील एका अभिमानास्पद भाषेला आपण 'माय मराठी' म्हणतो, याचा आत्मीय अभिमान बाळगण्याचा हा दिवस आहे. प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारात, शिक्षणात, प्रशासनात, माध्यमांमध्ये आणि दैनंदिन संभाषणात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याचा संकल्प करण्याचा हा दिवस आहे.

वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी साहित्य आणि भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. २१ जानेवारी २०१३ रोजी मराठी भाषा विभागाने अधिकृतपणे या दिनाची घोषणा केली तसेच ३ ऑक्टोबर रोजी राज्यात 'अभिजात मराठी भाषा दिन' साजरा केला जातो. दरवर्षी दिवंगत माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतनिमित्त १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राज्यभरात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम, शैक्षणिक कार्यक्रम आणि वाचन उपक्रम राबविले जातात. या दोन्ही दिवसांत राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन होते. मराठी भाषेचा गौरव करण्याबरोबरच तिच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी चिंतन करण्याची ही संधी असते. चला, यावर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीला समृद्ध करणाऱ्या उपभाषांचा वाटा समजून घेऊया.

**विविध उपभाषांचा समृद्ध वारसा** : महाराष्ट्रात विविध बोलीभाषांचा विपुल वापर आढळतो. नाथ, महानुभाव आणि वारकरी संत परंपरेतील संतांनी प्राचीन काळापासून विविध बोलींचा वापर करून मराठी भाषेला अधिक व्यापक केले. आपण सर्वांनी आपल्या बालपणी चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ऐकली आहे. तुम्हाला माहिती आहे, श्रीचक्रधर स्वामींनी ही गोष्ट ८०० वर्षांपूर्वी रुसलेल्या एका मुलीला सांगितल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. कविश्रेष्ठ कालिदास, शूद्रक यांच्या शाकुंतल, मृच्छकटिक या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठी बोली भाषेत आहेत.



वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी, नागपुरी, झाडीबोली, खानदेशी, गोंडी, बंजारा, कोलामी अशा असंख्य उपभाषा मराठीच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. प्रत्येक उपभाषेला स्वतंत्र ऐतिहासिक व सांस्कृतिक पृष्ठभूमी आहे. जशा अनेक उपनद्या मिळून नदी अधिक विशाल आणि समृद्ध होते, तशाच या उपभाषांनी मराठी भाषेला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे. उदा. वऱ्हाडी ही अत्यंत प्रभावी उपभाषा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीते'त वऱ्हाडी भाषेचा प्रभावी वापर दिसतो. त्यांनी संपूर्ण गावगाडाच मराठीत मांडला आहे तसेच संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनांमधूनही वऱ्हाडीचा सहज आणि प्रभावी उपयोग आढळतो. आचार्य प्र. के. अत्रे यांनी गाडगेबाबांच्या वऱ्हाडी संबोधनाचे जाहीर कौतुक केले आहे.

कोकणी व मालवणी बोली त्यांच्या खास गोडव्यासाठी ओळखल्या जातात तर कोल्हापुरी बोली तिच्या रांगड्या ठसक्यासाठी प्रसिद्ध आहे. झाडीबोली आणि गोंडी भाषेच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन झाला आहे. झाडीबोलीतील नाटकांची परंपरा महाराष्ट्राला ज्ञात आहे. खानदेशी आणि अहिराणी भाषेचा गोडवा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो. उपभाषांवर प्रादेशिक प्रभाव असतो. उदा. कोकणी मराठीवर कन्नडचा प्रभाव जाणवतो. 'अक्का' हा मोठ्या बहिणीसाठी वापरला जाणारा गोड शब्द कन्नड-तेलुगू भाषांमधून मराठीत रूढ झाला आहे. वऱ्हाडीमध्ये, झाडीबोलीत हिंदीचे तर अहिराणीमध्ये गुजरातीचे अनेक शब्द सहजपणे मिसळलेले दिसतात. खरे तर हीच भाषेची खरी ताकद आहे स्वीकारण्याची आणि समृद्ध होण्याची!

**मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास** : उपभाषांनी मराठीला अधिक व्यापक आणि अभिव्यक्तिपूर्ण बनवले आहे. राज्य शासनाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक आणि साहित्यिक यांचा सन्मान करण्याचे निर्देश दिले आहेत. भाषाविषयक स्पर्धा, परिसंवाद, व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. विविध शासकीय कार्यालयांमध्ये त्रिभाषा सूत्राचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. मराठीचा प्रशासनिक, शैक्षणिक आणि सामाजिक वापर वाढविणे ही काळाची गरज आहे. शासन प्रयत्नशील आहेच; परंतु सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी विविध बोलीभाषांचा अभ्यास करून त्यांचा अभिमान बाळगला पाहिजे. भाषेचे संवर्धन हे केवळ धोरणातून नाही तर व्यवहारातून होते.

**मराठीचा वापर वाढवू या!** : 'उपभाषांनी समृद्ध झालेली माय मराठी' हा विचार मराठीच्या सर्वांगसुंदरतेची जाणीव करून देतो. भाषा ही आईसारखी असते- विशाल, सामावून घेणारी आणि ममत्वाने ओथंबलेली. महाराष्ट्रात येणारी कोणतीही व्यक्ती या भाषेचा गोडवा अनुभवत ती सोबत घेऊन जातो. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा या भाषेचा उदात्त बाणा आहे. त्यामुळे आज मराठी भाषा गौरव दिनाला जागतिक स्तरावर मराठीचा सन्मान टिकविण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे यासाठी मराठी माध्यमातील शिक्षणाचा प्रसार करणे, मराठी शाळांचे अस्तित्व टिकविणे, आधुनिक माध्यमांवर मराठीत अभिव्यक्त होणे, दैनंदिन व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापर ही अत्यावश्यक पावले आहेत. दिवंगत कविवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी मराठीच्या सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे-

'मराठीची प्रतिभा, ज्ञानेश्वरीत समावते
ग्रामगीता गाथाही, मराठीतच मावते
लावणीतून मराठीचे, सौंदर्य ओसंडते
शौर्य आणि औदार्य, पोवाड्यातून सांडते
मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले
गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले
अमृताशी पैज जिंकते, मराठी बोली
आभाळाची उंची जिच्यात, समुद्राची खोली
साऱ्यांनी मराठी हुंकारावर डोलावे
मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलावे..!

चला, मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्व एक संकल्प करूया, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलूया..!

९७०२८५८७७७

(लेखक कोल्हापूरच्या विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक आहेत.)

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# असे वर्धेतील विद्यापीठ काय कामाचे?

विद्यापीठ म्हणजे केवळ विटा-सिमेंटची इमारत नसते; ती राष्ट्राची विचारशाळा असते. इथून पदवी-पदविका घेऊन निघणारी पिढी उद्याचा देश चालवणार असते. म्हणूनच विद्यापीठात कोणते विचार पेरले जातात यावर विद्यार्थ्यांचे, राष्ट्राचे भवितव्य अवलंबून असते. पण, जेव्हा हाच परिसर घोषणा, गटबाजी आणि राष्ट्रविरोधी चळवळीचे केंद्र बनतं तेव्हा असे विद्यापीठ काय कामाचे? असा सवाल या व्यवस्थेला विचारावासा वाटतो. ज्या विद्यापीठाची सर्व कमान राष्ट्रपतींच्या हाती आहे. येथील कुलगुरू राष्ट्रपतींच्या अधिपत्याखाली काम करतात त्या विद्यापीठातील रंजक कहाण्या ऐकल्यानंतर असे विद्यापीठ नसते तर बरे झाले असते, असेच म्हणावेसे वाटते. २१२ एकर एवढ्या विस्तीर्ण परिसरात ८ वसतिगृहे आणि देश-विदेशातील विद्यार्थी शिक्षण घेत असलेले वर्धेतील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्व विद्यापीठ आणि कुलगुरू कोणत्या ना कोणत्या प्रकरणात वादग्रस्त ठरत आले आहेत. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ देशात वादग्रस्त घटनांसाठी कुप्रसिद्ध झाले होते. त्याच पावलावर पाऊल ठेवत महाराष्ट्रात एकमेव असलेले महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ देखील सतत संशयाच्या भोवऱ्यात असते. हिंदी भाषा, भारतीय संस्कृती आणि राष्ट्रभक्तीचा प्रसार करण्याच्या उद्देशाने स्थापन झालेली संस्था जर स्थानिक इतिहासालाच नाकारत असेल तर? महाराष्ट्राच्या भूमीत राहून, मराठी मातीचा श्वास घेत, इथल्या जनतेच्या करातून चालणाऱ्या विद्यापीठात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीची सुट्टी न दिल्याने या विद्यापीठातील शिवभक्तांनी त्रागा सुरू केला आहे. केंद्र सरकारने तीन सुट्ट्या देण्याची परवानगी दिली असल्याचे विद्यापीठातर्फे सांगितले जात असले तर गतवर्षी याच विद्यापीठाने शिवाजी महाराज जयंतीनिमित्त दिलेली सुट्टी अवैध होती का? ती अवैध होती तर केंद्र सरकारने सुट्टी देणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई का केली नाही? या विद्यापीठात जवळपास १५ वर्षांपूर्वी अबझल खानाच्या वधाचे नाटक सादर करण्यात आले होते. तो विषय 'तरुण भारत'ने लावून धरला होता. त्या काळात या विद्यापीठामध्ये शिवाजी महाराजांचे साहित्यही उपलब्ध नव्हते. शिवाजी महाराज हे केवळ ऐतिहासिक व्यक्तिमत्त्व नाहीत; ते आमच्या स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. ज्यांच्या कर्तृत्वामुळे महाराष्ट्राची ओळख जगभर निर्माण झाली, त्यांच्याबद्दल उदासीनता दाखवणारे विद्यापीठ 'राष्ट्रीय' कसे म्हणावे? येथे पावलोपालवी मराठी माणसाचा अवमान होतो. विदर्भ सोडा, महाराष्ट्रातील अधिकारी-कर्मचाऱ्यांची संख्याही मोजकी आहे. त्या मोजक्यांचीही अवहेलना केली जाते. उत्तर भारतीय आणि डाव्या विचारसरणीच्या हातात गेलेल्या या विद्यापीठाला तत्कालीन कुलगुरू रजनीश कुमार शुक्ल यांनी ठिकाण्यावर आणण्याचा प्रयत्न सुरू केला होता. येथे मराठीच नव्हे, तर मराठी संतांचा मेळा (रामदास, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, मीराबाई आदी मूर्ती बसवल्या होत्या.) तयार केला होता. वर्धा शहरासोबत या विद्यापीठाची हळूहळू जवळीक निर्माण झाली होती. या विद्यापीठाच्या कुलगुरूंना शाप असल्यागत शुक्लही एका प्रकरणात अडकले. विद्यापीठात राष्ट्र जागरणाची ज्योत पेटत असतानाच त्यांना ऐन राष्ट्रपतींच्या दौऱ्यापूर्वी कुलगुरू या पदावरून हटवण्यात आले. मराठी आणि हिंदीचे मायमावशीचे नाते असताना येथे मराठीला छळले जात आहे. स्थानिक युवकांना नोकरीही दिली गेली होती. परंतु, काही काळातच त्या युवकांवर पुन्हा बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली. येथील कॅम्पसमध्ये विचित्र वातावरण तयार झाले आहे. येथे पोस्टर वॉर, आंदोलनं कायम होतात. शुक्ल यांची रवानगी होताच 'इन्कलाब जिंदाबाद'सारख्या घोषणा देत देशाच्या व्यवस्थेवर टीका करणारे महाभाग विद्यार्थी येथे वर्षोन्वर्षे डिग्रीच्या नावाखाली डेरा टाकून आहेत. समाजमाध्यमांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राष्ट्र विचाराच्या विरोधात उघडपणे लिहिणारे, टीका करणाऱ्यांना येथील जाहीर कार्यक्रमात निमंत्रित केले जाते. 'तरुण भारत'मधून वृत्त मालिका चालवत टीकेची झोड उठल्यानंतर कार्यक्रम आवरता घेतला गेला. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अर्थ देशाच्या अखंडतेला तडा देणे नाही. विद्यापीठात प्रश्न उपस्थित केल्याच गेले पाहिजेत. चर्चा व्हाव्यात. सोबत राष्ट्रहित जोपासले गेले पाहिजे. येथे डाव्या विचारसरणीने खोलवर पाय रोवले आहेत. येथे काहींनी आता विचारांना खुंटीवर टांगत संधी शोधण्याचा प्रयत्न सुरू केला असल्याने त्यांची पोळी शेकली जात आहे. राष्ट्रहित विचारधारेच्या विरोधात कायम चळवळ सुरू असल्याने येथे एक प्रकारे छुपा अजेंडाच राबविला जातो का, याचा शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे. शिक्षणाच्या बाबतीत कुठेही कमी नसलेल्या या विद्यापीठाकरिता केंद्र सरकारने डोळे उघडण्याची वेळ आली आहे. येथे निघणाऱ्या विकास कामांच्या निविदाही विशिष्टांच्या गळ्यात जात असल्याची ओरड असून हे राज्य शिवाजी महाराजांचे की खानाचे, असा प्रश्न पडल्या शवाय राहत नाही.

९८८१९०३७६५

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# शरद पवार रिटायर होणार की लढणार?

साऱ्या निवडणुका आटोपल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या काही निवडणुका सोडल्या तर आता येती तीन वर्षे कुठल्याही मोठ्या निवडणुका नाहीत. मग तीन वर्षे करायचे काय, असा प्रश्न राजकारण्यांपुढे आहे. सर्वाधिक टेन्शन विरोधी नेत्यांपुढे आहे. मात्र, राज्यसभेच्या निवडणुका आल्या आहेत. नंतर विधान परिषदेच्या निवडणुका आहेत. राज्यसभेच्या सात जागांसाठी महाराष्ट्रात येत्या १६ मार्च रोजी निवडणूक होऊ घातली आहे. त्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करायची अंतिम मुदत ५ मार्च आहे. कोण कुणासोबत राहणार आणि कोण कुणाची साथ सोडणार ते या तारखेला कळेल. राज्यसभेच्या या निवडणुकीत विधानसभेचे आमदार हे मतदार असतात. आमदारांचे संख्याबळ पाहिले तर एकूण सात जागांपैकी महायुतीचे सहा उमेदवार आरामात निवडून येऊ शकतात. निवडून येण्यासाठी ३७ मतांचा कोटा आहे. उरलेल्या एका जागेवर महाविकास आघाडीची एक जागा निवडून येऊ शकते. जे सात राज्यसभा सदस्य निवृत्त होत आहेत त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार एक आहेत. तब्येत साथ देत नसतानाही ८५ वर्षे वयाच्या शरद पवारांची लढायची इच्छा आहे, असे राज्यसभा सदस्य संजय राऊत यांनी म्हटले आहे. शरद पवार उभे राहिले तर ही निवडणूक अविरोध होण्याची शक्यता आहे. त्यांना सगळ्यांचा पाठिंबा आहे, असा दावा त्यांची कन्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला खरा; पण महाविकास आघाडीतल्या उबाठा आणि काँग्रेस या इतर घटक पक्षांनी या जागेवर दावा केल्याने सौदेबाजी सुरू आहे. पवारांसाठी जागा सोडण्याची 'राजकीय चैन' या दोघांना परवडेल का? काहीही होऊ शकते. उमेदवारी अर्ज भरायला १० दिवस उरले असताना ही निवडणूक रहस्यमय झाली आहे.

'आमच्या पक्षाची ही जागा आहे' असा दावा उद्धव ठाकरे यांचे पुत्र आणि उबाठाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केला आहे. '२०२० मध्ये आम्ही ही जागा राष्ट्रवादीला सोडली होती' याची ते आठवण करून देत आहेत. काँग्रेसनेही या जागेवर दावा सांगितला आहे. 'राज्यसभेच्या बदल्यात उद्धव ठाकरेंनी विधानपरिषद घ्यावी' असा काँग्रेसचा प्रस्ताव आहे. काँग्रेस नेत्यांचा शरद पवार यांच्या उमेदवारीला विरोध आहे. उबाठाकडे २० आमदार आहेत तर काँग्रेसकडे १६. दोघे एकत्र आले तर भट्टी जमते. वांधा तिथेच आहे. शरद पवारांना बाजूला ठेवून बिनविरोध निवडणूक होऊ शकते. पण विरोधकांच्या भाषेत बोलायचे तर मतदान नाही ती निवडणूक कशी? उद्धव ठाकरे मतदानाशिवाय आमदार झाले होते. तेव्हा ते मुख्यमंत्री होते. मात्र, सहा महिन्यात निवडून यायचे होते. कसे येणार? तो कोरोना काळ होता. चहुकडे टाळेबंदी होती. सहा महिन्यात निवडून आलो नाही तर सरकारही गडगडेल या विचाराने उद्धव ठाकरेंना तेव्हा घाम फुटला होता. शेवटी पंतप्रधान मोदी यांच्या दाढीला हात लावून कशीबशी विधानपरिषद निवडणूक लावून घेतली होती. आताच्या निवडणुकीत वेगळाच पेच आहे. गेली ६० वर्षे महाराष्ट्राचे राजकारण शरद पवारांभोवती फिरत आले. आताही शरद पवार लढतात का? हाच 'टर्निंग पॉईंट' आहे. पवार मैदानात नसतील तर त्यांचे १० आमदार फुटू शकतात. पवार मैदानात आले तरी उद्धव ठाकरे दगा देऊ शकतात आणि काँग्रेसचा भरवसा नाही.



शरद पवार गेली ६० वर्षे ते कधी विधानसभा तर कधी संसदेत राहत आले. राज्यसभेच्या त्यांच्या दोन टर्म झाल्या. तरीही त्यांना पुन्हा इच्छा आहे. उबाठा आणि काँग्रेसने नाही म्हटले तर त्यांना रिटायर व्हावेच लागेल. मग त्यांच्या अंतिम इच्छेचे काय? स्वर्गीय अजितदादांच्या पत्नी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आपल्या या सासऱ्याला सुखासुखी राज्यसभेत पाठवतील? सुनेत्रा पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांना २०१९ मध्ये माढामधून लढायचे होते. पण पवारांनी त्यांची संधी नाकारली होती. मग मावळमधून पार्थ उभे राहिले तेव्हा ते पडतील, याची सारी काळजी पवारांनी घेतली होती. या वेदना सुनेत्रा पवार विसरल्या असतील? शरद पवारांना मागेच भाजपासोबत जायचे होते. पण भाजपा की महाविकास आघाडी? पवार ठाम निर्णय करू शकले नाहीत. त्यांचा जीव आपल्या लाडक्या कन्येमध्ये अडकला आहे. आपण मुलीला 'सेटल' करू शकलो नाही, ही खंत त्यांना आज कुरतडत आहे. ज्या सुनेला 'बाहेरून आलेली पवार' म्हटले तिच्याच हाती पवार घराण्याचा वारसा चालला या जाणिवेने त्यांना अस्वस्थ करून सोडले आहे. दोन राष्ट्रवादीच्या विलीनीकरणातून त्यांना सुप्रियाची गॅरंटी घ्यायची होती. ती मिळण्यापूर्वीच अजितदादा गेले. आता उरलेल्या राष्ट्रवादीवर ताबा मिळविण्याचा काकाचा डाव होता. मात्र, सुनेत्रा वहिनींचा झटपट चौथ्या दिवशीच उपमुख्यमंत्री म्हणून शपथविधी झाल्याने तोही उधळला गेला. दादाच्या बाराव्यापर्यंत सुनेत्रा थांबल्या असत्या तर राष्ट्रवादीचं तेरावं करून शरद पवार मोकळे झाले असते. रक्तगटातली सुप्रिया की आजचा पवार ब्रँड म्हणजे सुनेत्रा! कोणाला सांभाळायचे? पवारांचे घोडे इथे अडले आहे. त्यामुळेच एनडीएमध्ये जाणार नाही, या प्रश्नाचे उत्तर देण्याऐवजी त्यांनी स्वतःला रुग्णालयात कोंडून घेणे पसंत केले. आता तर नातू रोहित पवार हे आपणच 'पुढचे शरद पवार' आहोत, अशा थाटात वावरत आहेत. आयुष्यभर साऱ्यांना संभ्रमावस्थेत ठेवत आलेले शरद पवार आज स्वतः प्रचंड संभ्रमावस्थेत आहेत. तब्येत साथ देत नाही, दुसऱ्याच्या आधाराशिवाय चालता येत नाही, धड बोलता येत नाही, बोललेले इतरांना समजत नाही अशा विकलांग अवस्थेतही त्यांचा राजकारणाचा मोह सुटत नाही. पण त्यांना कोण वाचवणार? एकच माणूस वाचवू शकतो. तो म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. ज्यांना नेहमी पाण्यात पाहिले ते फडणवीस. फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा शरद पवार काय बोलले होते ते आठवा. 'पूर्वी छत्रपती हे पेशवे नेमायचे. आता पेशवे छत्रपती झाले-' एक ब्राह्मण मुख्यमंत्री झाला हे त्यांना सांगायचं होतं. शरद पवारांनी आपल्या आयुष्यात खूप कमावलं. खूप ढापलं, अनेक माणसं फोडली, अनेक घरं फोडली. सारे कमावले, पण विश्वास कमावला नाही. त्यामुळेच आज 'पेशवा-अनाजीपंत' म्हणत ज्यांना हिणवलं त्या पेशव्याकडे खासदारकीची वस्त्रं मागायची पाळी त्यांच्यावर आली आहे. फडणवीस 'चाणक्य' आहेत. संख्याबळ नसताना गणितं जुळवत त्यांनी २०२० मध्ये भूकंप घडवले होते. तुम्ही लिहून ठेवा. सातव्या जागेचा तीळ आघाडीतल्या तिघांनी वाटून खाल्ला नाही तर फडणवीस यांची जादू चालणार.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## मेडिकल टुरिझम

युरोप-अमेरिकापेक्षा भारतात आरोग्य सेवा त्वरित व स्वस्त आहेत, हे सर्वांना विदित आहेच. बाहेरदेशी नोकरी-व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेले भारतीय नागरिक भारतात येऊन आरोग्य सेवा घेतात. भारताचे शेजारील पाकिस्तानसारख्या देशातील आजारी लोक भारतात उपचारांसाठी येतात. सध्या भारताची प्रतिमा जगात बरीच उजळली आहे. येथे उत्कृष्ट व स्वस्त सेवा देणाऱ्या अनेक नावाजलेल्या आरोग्य संस्था आहेत. शिवाय औषधीसुद्धा परवडणाऱ्या किमतीत मिळतात. कोरोना काळात भारतीय संस्थांनी प्रभावी औषधी निर्यात केल्या व आफ्रिका खंडातील अनेक नागरिकांना त्याचा लाभ मिळाला. ऐतिहासिक स्थळांमुळे भारतात सहलीचे ठिकाण म्हणून सुप्रसिद्ध आहे. आपले शासन, आपल्या आरोग्य संस्था, डॉक्टर मंडळी व विमान कंपन्यांनी भारतात मेडिकल टुरिझम वाढवायला मदत करावी, अशी विनंती आहे. जनतेने सुद्धा सार्वजनिक स्वच्छता पाळावी, यात सर्वांचेच भले आहे.

**गणेश हजारे** /८६९८८१५५५९

## गझल सम्राट पंकज उधास



आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा गुरुवारी दुसरा स्मृतिदिन. पंकज उधास यांच्या निधनाने संगीत विश्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या 'नाम' चित्रपटातील त्यांनी गायलेल्या 'चिठ्ठी आई है...' या गाण्याने ते घराघरात पोहोचले. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहानी याद आई, मोहरा यांसारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली. ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. असे असले, तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत. त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी 'कर्मा' या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्वगायन केले; मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही. त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या-मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो करू लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले; मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती. १९७९ साली त्यांना 'जवाब' या चित्रपटातील 'मितवा रे मितवा...' हे गाणे गाण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

## वाचक पत्रे

## योग्य निर्णय...!

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी एक अतिशय योग्य आणि महत्त्वाची घोषणा केली आहे. 'मुलींनो, नीट आणि सुसंस्कृत कपडे घाला. अर्धवट किंवा अयोग्य कपडे घालून सोशल मीडियावर व्हिडीओ टाकू नका. अन्यथा तुमची सोशल मीडियावरील सर्व अकाऊंट्स डिलिट होणार आणि आधार कार्डही बंद होणार!' खरोखरच किती महत्त्वाचा निर्णय आहे. आज सोशल मीडियावर चित्रपटातील काही व्यक्ती आणि त्यांचे अनुकरण करणारे सर्वसाधारण लोक यांचा जो काही धुमाकूळ चालला आहे, ते बघून खंत वाटते. आपली संस्कृती शालीन, सुसंस्कृत आहे. पण पाश्चिमात्य देशाचे अंधानुकरण करून देश रसातळाला जात आहे. प्रसिद्धीसाठी कोणताही अयोग्य मार्ग निवडला तर अधोगतीच आहे. राष्ट्रपतींचा हा निर्णय योग्यच आहे. स्त्री ही शक्तीचे रूप आहे. तिचे सौंदर्य अंगभर वस्त्रात शोभून दिसणारे आहे. मात्र बरेचदा रियालिटी शोच्या माध्यमातून अशोभनीय प्रकार बघताना संकोचात्मक परिस्थिती निर्माण होते. हे कुठेतरी थांबायला हवे. यावर आळा घातला गेला पाहिजे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

## झाडांवर इलेक्ट्रिक लाईट्सची रोषणाई पर्यावरणाला हानीच!

वृक्षवेलींना पण जीव असतो हे आता वेगळे सांगण्याची गरज नाही, पण अजूनही काही लोकांच्या हे ध्यानात नाही असे वाटते. झाडांवर इलेक्ट्रिक लाईट्स लावून रोषणाई करू नये, असं वाचण्यात आलं होतं. वृक्षांना खिळे ठोकून पाट्या लावणे पण ठीक नाही. हे पण सांगून झालं, पण फरक पडलेला दिसत नाही. परवाच यवतमाळ ते नागपूर प्रवासात असं दिसलं की, रस्त्यात संपूर्ण ढाबे अणि हॉटेल्स हे रंगीबेरंगी लाईटच्या रोषणाईने झगमगत होते. अर्थात ही सर्व रोषणाई नयनसुख तर देत होतीच; पण हे सर्व त्यांनी झाडावर रोषणाई करून केलेले होते म्हणून वाईट वाटले. नागपुरात अशी सजावट अनेक हॉटेल्सच्या समोर झाडांवर केलेली दिसते. आपण सर्व स्वतःला पर्यावरणप्रेमी समजतो आहोत ना; मग हे सर्व व्हायला नको. त्यासाठी संबंधितांनी लक्ष द्यायला हवे असे वाटते.

**गौरी पटवर्धन** /९४२२११६३०५

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ई-मेल अॅड्रेस tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## स्वा.सावरकर महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन



**बीड (प्रतिनिधी)** | देशातील साहित्यिकांनी निर्माण केलेल्या साहित्यामध्ये प्रतिभेचा मोठा अनुबंध आहे, तो अनुबंध जपला पाहिजे असे प्रतिपादन डॉ. संदीप बनसोडे यांनी केले. येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयामध्ये आयोजित मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मुळे हे होते. व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, मराठी विभाग प्रमुख सोपान सुरवसे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ बनसोडे म्हणाले की मराठी भाषेला समृद्ध असा वारसा आहे. वि. वा. शिरवाडकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी त्यांच्या साहित्यातून भाषेला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. साहित्यिकांच्या प्रतिभेचा हा समृद्ध असा अनुबंध जपला पाहिजे असे ते म्हणाले. यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे म्हणाले की स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मराठी भाषेला अनेक शब्द दिले आहेत. सावरकरांचे समग्र साहित्य प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सोपान सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन मराठी विभागातील डॉ मेधा गोसावी यांनी केले. आभार प्रा. संजय काळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात मराठी विभागाने तयार केलेल्या 'अक्षराचे झाड' उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

## भव्य महिला मॅरेथॉनचे आयोजन ७ किमी अंतर; प्रथम पारितोषिक ₹१५ हजार

**बीड: (प्रतिनिधी)** | जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही रविवार, दि. ८ मार्च रोजी भव्य 'महिला मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ६ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे मान्यवरांच्या हस्ते मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवण्यात येईल. ७ किलोमीटर अंतराच्या या स्पर्धेला याच क्रीडांगणावरून प्रारंभ होऊन नगर रोडमार्गे पुन्हा क्रीडांगणावरच समारोप होणार आहे. स्पर्धा दोन वयोगटांत विभागण्यात आली असून १० ते १८ वर्षे तसेच १८ वर्षांवरील महिलांसाठी स्वतंत्र गट ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक गटातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकांना अनुक्रमे रुपये १५,०००, १०,००० व ७,००० अशी पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. सर्व सहभागी स्पर्धकांना टी-शर्ट, नाश्ता व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लहान गटासाठी ५० रुपये तर मोठ्या गटासाठी २०० रुपये नोंदणी शुल्क निश्चित करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनी तसेच पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या इच्छुक मुली व महिलांनी शुक्रवार, दि. ६ मार्चपर्यंत आपली नोंदणी करून सहभाग निश्चित करावा. अधिक माहितीसाठी ८७८८५३७३४४ किंवा ८२७५५४२०८२ या क्रमांकावर संपर्क साधावा व मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## पुण्यतिथी निमित्ताने विज्ञान प्रदर्शन व मातृभाषा दिन कार्यक्रम संपन्न



**बीड** | विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चिकित्सक वृत्ती हवी मुली सुद्धा सर्व क्षेत्रात आहेत असे प्रतिपादन श्री जे बी कुलकर्णी यांनी केले. ते नानाजी देशमुख विद्या मंदिर येथे आयोजित विज्ञान प्रदर्शनाच्या अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते. पुढे ते म्हणाले की, सायन्स चा योग्य वापर केला तर मानवाचे सर्व क्षेत्रात कल्याण झाले आहे. मराठी भाषा दिनाविषयी त्यांनी माहिती सांगितली. मराठी भाषा दिन हा कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो. यावेळी मंचावर जे.बी.कुलकर्णी सर, सुनील खंडागळे सर, भागवत धस सर, डॉ.सीमा ताई जोशी, गंगाधर जी देशमुख सर, एस. एन. कुलकर्णी सर, अर्चनाताई मोराळे, आरती ताई जोशी उपस्थित होते. विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या प्रतिमापूजनाने व दीप प्रज्वलनाने करण्यात आले. प्रमुख पाहुणे श्री.खंडागळे सर यांनी मार्गदर्शनात विज्ञानाचे टप्पे सांगितले त्यामध्ये नॉलेज, एप्लिकेशन्स, स्किल डेव्हलपमेंट, क्रिएटिविटी असे सांगितले, दुसरे मार्गदर्शक श्री.धस सरांनी झाडाचं उदाहरण देऊन् संगीतले की काही झाडांना फूल असते काहीना नसते प्रत्येक गोष्ट शिकण्यासारखी आहे. यातून एखादा वैज्ञानिक होईल अशी खात्री त्यांनी व्यक्त केली. एस. एन. कुलकर्णी सरांनी मराठी भाषा दिनानिमित्त इंग्रजी शब्दांचे मराठी शब्द सांगून उपस्थितांना मराठी भाषेविषयीचे महत्त्व विशद केले. जे. बी. कुलकर्णी सर यांनी या उपक्रमांचे आणि पर्यावरण आणि सोलार ऊर्जा या विषयाचे कौतुक केले.

# बीडच्या प्रश्नांवर आ. सुरेश धस यांची मुख्यमंत्र्यांची चर्चा

तभा. वृत्तसेवा

**बीड** | भाजपचे आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भेट घेऊन बीड जिल्हा व माझ्या मतदारसंघातील विविध प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली.

बीड जिल्हा व संपूर्ण मराठवाडा परिसरात घडलेल्या मल्टिस्टेट बँक घोटाळ्यांमुळे अनेक सर्वसामान्य ठेवीदारांचे कष्टाचे पैसे अडकून पडले आहेत. या ठेवीदारांना न्याय मिळावा व त्यांचे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी मुख्यमंत्री महोदयांसमोर मांडली. यासंदर्भात लवकरच उच्चस्तरीय बैठक घेऊन सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.



स्व. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर त्यांचे बंधू धनंजय देशमुख यांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. त्यांना जिल्हास्तरीय सुरक्षेपेक्षा राज्यस्तरीय सुरक्षा देण्यात यावी, तसेच या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे याला तातडीने अटक करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि न्यायालयीन प्रक्रियेत कठोर शिक्षा सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलावीत, अशी ठाम मागणी केली.

तसेच मतदारसंघातील विविध प्रलंबित विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

### पोलीस पाटील भरती मधील गैरप्रकारामुळे पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह

## जिल्हाधिकाऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल- ॲड. अजित देशमुख

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | बीड जिल्ह्यात पोलीस पाटील पदासाठी भरती प्रक्रिया चालू आहे. जिल्हा प्रशासनाने ही भरती पारदर्शकतेने करायचे ठरवले होते. मात्र काही ठिकाणावरून आलेल्या तक्रारीवरून पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त तथा स्वराज्य जनजागृती परिषदेचे अध्यक्ष ॲड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.

जिल्ह्यात मोठ्या संख्येने पोलीस पाटील पदे भरण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानंतर परीक्षा केंद्रावर स्वतः जिल्हाधिकारी यांनी देखील भेटी दिल्या. त्यामुळे परीक्षा पारदर्शकतेने होईल आणि पात्र गोरगरिबांना न्याय मिळेल. पात्र व्यक्ती निवडले जातील, अशी आशा होती. मात्र काही ठिकाणच्या तक्रारीवरून बीड जिल्हा सुधारायला तयार नाही, हे स्पष्ट दिसत आहे. दरम्यान, माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयाने एक हजार सोळा उमेदवार पात्र ठरवून मुलाखतीसाठी यादी जाहीर केली होती. ही यादी त्यांनी पटलावर जाहीर केली. यानंतर अनेकांनी या यादीवर आक्षेप घेतले. त्यानंतर उपविभागीय अधिकारी, माजलगाव यांनी या यादीमध्ये तांत्रिक चुका झाल्याचे स्पष्ट करत मुलाखतीसाठी निवडलेल्या या उमेदवारांची यादी रद्द केली. यावरून मोठा गैरप्रकार समोर आला आहे. तांत्रिक कारण दाखवणे योग्य नाही. यादी जाहीर करताना ती जबाबदारीने जाहीर केली पाहिजे. मात्र ही जबाबदारी यादी जाहीर करताना कोठे हरवली होती ? हा देखील प्रश्न निर्माण होत आहे. तर दुसरीकडे परळी येथून प्राप्त झालेल्या तक्रारीमध्ये एका महिलेने ज्या परीक्षा केंद्रावर होमगार्ड म्हणून नोकरी केली, त्याचवेळी होमगार्ड म्हणून ड्युटी बजावत असताना पोलीस पाटील पदासाठी परीक्षा दिल्याचे उघडकीस आले आहे.

## श्री योगेश्वरी देवस्थानाला मुंबईच्या एका भक्ताकडून १ कोटींची देणगी

तभा. वृत्तसेवा

**बीड** | महाराष्ट्रातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री योगेश्वरी देवीच्या मुंबई येथील भक्ताने मंदिराच्या शिखर बांधकामासाठी थ एक कोटी रुपयांची देणगी दिली. नाव न सांगण्याच्या अटीवर देणगी दिली. अंबाजोगाई येथील श्री योगेश्वरी देवीच्या मंदिराचे असलेले शिखर हे शंभर वर्षापूर्वीचे आहे. त्याचे बांधकाम चुन्यात असल्याने ते आता तकलादू झाले आहे. या शिखराच्या कामाचा जीर्णोद्धार करणार असल्याचे योगेश्वरी देवल कमिटीने जाहीर केले. याची माहिती मुंबई येथील भक्ताला माहीत झाली.

या शिखराच्या कामासाठी किमान ८० ते ९० लाख रुपयांचा खर्च येणार असल्याचे त्यांना समजले. त्यांनी श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या विश्वस्तांकडे

एक कोटी रुपयांचा धनादेश पाठवून दिला. त्या धनादेशाची रक्कम बँकेत जमादेखील झाली. आता या शिखराच्या रकमेतून मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम या आठवड्यात सुरू होत आहे.

या कामासाठी तामिळनाडू येथील खास कारागीर नक्षीकाम करत या शिखराचे बांधकाम पूर्ण करणार आहेत.

## वाल्मीक कराडचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला

तभा. वृत्तसेवा



**बीड** | मस्साजोग(ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण व निर्घृण हत्या प्रकरणातील प्रमुख सूत्रधार वाल्मीक कराड याचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला. यापूर्वी विविध न्यायालयांनी वाल्मीक कराडचा जामीन तसेच दोषमुक्तीसाठीचे अर्ज फेटाळले होते.

सरपंच संतोष देशमुख यांचे नऊ डिसेंबर २०२४ ला टाकळी फाट्याजवळून (ता. केज) अपहरण करून त्यांची निघृण हत्या करण्यात आली होती. हत्या, अवादा कंपनीकडे दोन कोटींची खंडणी मागणी, याच कंपनीच्या मस्साजोग प्रकल्पावरील भांडण व तेथील सुरक्षा रक्षकाला जातीवाचक शिवीगाळ या तिन्ही प्रकरणांचा एकत्रित तपास विशेष पथकाने केला. यात वाल्मीक कराड, विष्णू चाटे, सुदर्शन घुले, महेश केदार, जयराम चाटे, प्रतीक घुले, सुधीर सांगळे व कृष्णा आंधळे यांच्यावर कट करून खून, खंडणी, जातीवाचक शिवीगाळ केल्याचे आरोप निश्चित करण्यात आले. यातील कृष्णा आंधळे अद्याप फरारी आहे. या प्रकरणाची सुनावणी येथील विशेष मकोका न्यायाधीश व्यंकटेश पटवदकर यांच्या न्यायालयात सुरू आहे.

या प्रकरणात वाल्मीक कराड याचे नाव आल्यानंतर पुन्हा त्याच्यावर आवादा कंपनीला खंडणी मागितल्याचा गुन्हा नोंद झाला. त्यानंतर तो डिसेंबर २०२४ मध्ये पुण्यात पोलिसांना शरण आला. त्यानंतर त्याला अटक झाली. सुरवातीला काही दिवस पोलिस कोठडी व नंतर तो न्यायालयीन कोठडीत आहे.

वाल्मीक कराडने यापूर्वी स्थानिक न्यायालयात जामीन, दोषमुक्तीसाठी केलेले अर्ज फेटाळल्यानंतर त्याने

उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयानेही त्याचा जामीन, दोषमुक्तीसाठीचा अर्ज फेटाळला होता. त्यानंतर त्याने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश यांनी वाल्मीक कराडचा जामीन अर्ज फेटाळला. मात्र, 'ट्रायल' पुढे जात नसेल तर वाल्मीकला पुन्हा जामिनासाठी अर्ज करता येणार आहे.

## बीडमध्ये उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करण्याच्या मागणीसाठी वकिलांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

तभा. वृत्तसेवा

**बीड** | बीड येथे उच्च न्यायालयाचे खंडपीठ स्थापन करावे या मागणीसाठी जिल्हा न्यायालयातील वकिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला... बीड जिल्ह्यात वेगवेगळ्या तालुक्याच्या ठिकाणी अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय झाले आहेत... बीड जिल्ह्यातून दाखल होत असलेल्या विविध प्रकरणांची संख्या पाहता न्याय आपल्या दारी या संकल्पनेतून बीडमध्ये खंडपीठ सहकार न्यायालय व कामगार न्यायालय स्थापन करावे तसेच शेजारच्या जिल्ह्यांना देखील या खंडपीठाला संलग्न करावे यामुळे सर्वांसाठीच सोयीचा निर्णय होईल...



याबाबतची कार्यवाही करावी अशी मागणी वकील संघाच्या वतीने करण्यात आली याबाबतचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले आहे..

## बीड - जयभवानीचे १११ दिवसामध्ये ५२४७८७ मेट्रिक टन गाळप पूर्ण

तभा. वृत्तसेवा

**बीड** | गढी येथील जयभवानी सहकारी साखर कारखान्याच्या ४३ व्या गळीत हंगामाचा सांगता समारंभ श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान कुंभेजळगाव येथील महंत दत्ता महाराज गिरी आणि जयभवानी कारखान्याचे व्हाईस चेअरमन भाऊसाहेब नाटकर यांच्या हस्ते विधिवत पुजा करुन संपन्न झाला.

यावेळी बोलतांना कारखान्याचे व्हा. चेअरमन भाऊसाहेब नाटकर म्हणाले की, कारखान्याच्या ५० वर्षाच्या काळामध्ये कारखान्याने मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. शिवाजीराव दादांनी पाहिलेले स्वप्न साकार होतांना दिसून येत आहे. हा गळीत हंगाम सर्व ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी वाहतूक ठेकेदार, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी/कामगार, संचालक आणि हितचिंतकांनी केलेल्या सहकार्यातुन यशस्वी झालेला आहे. १११ दिवसामध्ये कारखान्याने ५२४७८७ मेट्रिक टन गाळप पूर्ण केले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थान चे महंत ह.भ.प. गुरुवर्य दत्ता महाराज गिरी यांनी आशिर्वादपर मनोगत व्यक्त केले.

## बीड - महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने कार्यशाळा

तभा. वृत्तसेवा

**बीड** | मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे महाविद्यालयातील महिला तक्रार निवारण समिती यांच्या वतीने 'लैंगिक छळ प्रतिबंध व तक्रार निवारण' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले हे उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी महाविद्यालयातील सुरक्षिततेबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थिनींच्या सुरक्षेसाठी महाविद्यालयात विविध उपाययोजना राबविण्यात येत असून विद्यार्थ्यांनी कोणतीही भीती न बाळगता तक्रार नोंदवावी, असे आवाहनही त्यांनी केले. कार्यशाळेसाठी महिला तक्रार निवारण समितीच्या बाह्य सदस्या मनिषा तोकले उपस्थित होत्या. त्यांनी लैंगिक छळ प्रतिबंध अधिनियम २०१३, तसेच महिलांचे कायदेशीर हक्क याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

## रामराव पाटील विद्यालयाचे घवघवीत यश

तभा. वृत्तसेवा

**केज** | शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या एन. एम. एम. एस. परीक्षा मध्ये केज येथील रामराव पाटील शाळेने यशाची परंपरा कायम राखत ३३ पैकी १४ मुलांनी यश संपादन केले आहे यामध्ये जाधव पंकज बब्रुवान या विद्यार्थ्यांनी १२८ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटाकावलेला आहे, तसेच घाडगे उत्कर्ष याने १०४ गुण, महाजन आदित्य याने १००,गुण चाटे राजेंद्र यांनी ९६ गुण मिळवलेले आहेत या विद्यार्थ्यांना श्री पोटभरे श्री देवकते श्री इर्शाद



श्री कळेकर श्री गोरे श्री गायकवाड,श्री नाईकनवरे यांनी मार्गदर्शन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व अध्यापकांचे शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्री खोसे व माऊली विद्यापीठाचे सचिव आदित्य पाटील,प्रशासकीय प्रताप मोरे यांनी अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व अध्यापकांचा यावेळी शाळेच्या वतीने गौरव करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री गोरे यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रीमती गिरी यांनी केले.

# महिलेचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी प्रकरणी आरोपीस सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा

तभा. वृत्तसेवा

**बीड** | दिनांक ०१.१२.२०२० रोजी आरोपी याने महिलेचा वाईट हेतुने हात धरून व जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी शिरूर तालुक्यातील रा. पाडळी या गावचा रहिवासी असलेला आरोपी नामे. दत्ता भिमराव दुधाळ यास मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश -१ मा. व्ही. एच. पाटवदकर साहेब यांनी दोषी ठरवून ६ महिने करावास व १,०००/ रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना कारावास एवढयाा दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल ॲड. अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले.

या प्रकरणी थोडक्यात हकिगत अशी की, दिनांक ०१.१२.२०२० रोजी दुपारी अंदाजे बारा वाजण्योच सुमारास मी पिण्याने पाणी पाडळी येथील बौध्दविहारा समोरील सरकारी बोर वरून पाणी भरून घरी जात असतांना आरोपी नामे. दत्ता भिमराव दुधाळ हा माठीमागुन मोटारसायकल वर येवून मला म्हणाला की, "ऐ राणी जरा बाजुला सरक" तेव्हा मी त्याला म्हणाले की, जरा निट बोलता येतः नाही का तेव्हा तो म्हणाला की, ये तुझे सारख्या भेडगीन माहारीनला काय निट बोलायचे, चल निह निघ नाहीतर ईथेच तुझा कार्यक्रम करीन, त्यानंतर आरोपी याने गाडीवरून खाली उतरून वाईट हेतुन हात धरून मला



ओढाओढी करू लागला व मला म्हणाला की, तुझा कंड कसा जिरवायचा मला माहित आहे. त्यानंतर आरोपी याने माझे केस व साडीला धरून ओढाओढ सुरू केली व खाली पाडुन छातीवर डोक्यात बुक्याने हाणमार करून व जीवे मारण्याची धमकी दिली.

पिडीतेच्या फिर्यादीवरून पोलीस स्टेशन शिरूर कासार येथे आरोपी विरूध्द कलम ३५४-अ, ३२३,५०४ भादवी आणि कलम ३(१) (आर), (एस), ३(१) (डब्यू) (आय) अनुसुचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला. सदर फिर्यादीवरून तात्कालील उपविभागीय अधिकारी आष्टी श्री. विजय लगारे यांनी या प्रकरणाचा तपास केला व जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथे आरोपी विरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

सदर प्रकरणी सुनावर्णी जिल्हा व सत्र न्यायाधीश १ मा. व्ही.एच. पाटवदकर साहेब बीड यांच्या न्यायालयात झाली. सदर आरोपी विरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ०८ साक्षीदार तपासण्यात आले व सदर प्रकरणत पिडीता, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, तपासी अधिकारी यांचा पुरावा व सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद ग्राहय धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश १ मा. व्ही.एच. पाटवदकर साहेब यांनी आरोपी यास कलम ३५४-अ, ३२३,५०४ भादवी आणि कलम ३(१) (r) (s), ३(१) (w) (i) अनुसुचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ करीता ६ महिने साधा करावास व १,०००/रुपये दंड व दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास एवढ्या दंडाची शिक्षा ठोठावली आहे. सदर प्रकरणात सहा सरकारी वकिल अजय श्रीमंतराव तांदळे यांनी काम पाहिले. उपविभागीय अधिकारी आष्टी श्री. विजय लगारे व पैरवी अधिकारी पोलीस कॉन्स्टेबल श्रीमती. सारीका ढाकणे व श्री. गव्हाणे यांनी सहकार्य केले.

धाराशिव
जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## हनुमंत पवार यांच्यावर हल्ल्याच्या निषेधार्थ कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२७ फेब्रुवारी -**

काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर झालेल्या मारहाणीच्या घटनेचा निषेध करत संबंधित आरोपीला तात्काळ अटक करून कडक कारवाई करावी, अशी मागणी लोहारा तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पुणे येथील कार्यालय परिसरात भाजप समर्थक म्हणून ओळख सांगणाऱ्या तुषार दामगुडे याने बंदुकीचा धाक दाखवत हनुमंत पवार यांच्यावर मारहाण केली.

ही घटना अत्यंत निषेधार्ह असून विचारांची लढाई ही विचारांनीच लढली पाहिजे, असे मत निवेदनात व्यक्त करण्यात आले आहे.

काँग्रेस पक्षाचे विचार, धोरणे व भूमिका सुसंस्कृतपणे मांडणाऱ्या पवार यांच्यावर भ्याड हल्ला करणाऱ्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर तालुकाध्यक्ष शामसुंदर तोंडकरी, ओबीसी तालुकाध्यक्ष दत्तात्रय गाडेकर, शहराध्यक्ष प्रकाश होंडराव, रौफ बागवान, इस्माईल मुल्ला, शरणाप्पा शेगजी, अँड. माशाळकर, बसवराज पाटील, शरणाप्पा कबाडे, निशिकांत गोरे, प्रभाकर बिराजदार, बालाजी होंडराव, उमर शेख, अविनाश मुळे, तुकाराम वाकळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...



### 'ज्ञानोद्योग'चा एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश

**येरमाळा, दि.२७ फेब्रुवारी -**

येरमाळा येथील ज्ञानोद्योग विद्यालय मधील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एनएमएमएस) परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विद्यालयाच्या वतीने यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य सुनील पाटील हे होते. एनएमएमएस परीक्षेत यश मिळविणाऱ्या पायल बालाजी काळे, प्रतिमा सुखदेव गायके, मयुरी मारुती बारकुल, येवारे गजानन शिवकुमार, गौरी रामकृष्ण पवार, राजनंदिनी सागर उंबरदंड, तनुजा उमेश बेडके, श्रावणी रामहरी सानप, श्रेया कृष्णा बारकुल, अमृता अण्णासाहेब दगडे, समृद्धी नानासाहेब ओव्हाळ, संध्या चंद्राजी पवार, अनुष्का समाधान कांबळे, वैष्णवी परमेश्वर गुंजाळ, अक्षरा शितल पायाळे, जानवी सतीश पौळ आदी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगतातून शिक्षक व पालकांचे आभार व्यक्त केले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत शिक्षकांच्या परिश्रमांचेही विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पेज गुडे यांनी केले. सूत्रसंचालन पर्यवेक्षक डी. बी. मोरे यांनी तर आभार प्रदर्शन अमर बारकुल यांनी केले. कार्यक्रमास पालक, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### जावळे पाटील महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

**लोहारा, दि.२७ फेब्रुवारी -**

लोहारा शहरातील शंकरराव जावळे पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य डॉ. शेषेराव जावळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. दत्ता कोटरंगे यांच्या हस्ते ज्ञानपीठ व पद्मभूषण पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर प्रा. कोटरंगे यांनी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करत मराठी भाषेचा गौरवशाली इतिहास उलगडून सांगितला. याप्रसंगी डॉ. विनायक पाटील, डॉ. मनोज सोमवंशी, डॉ. भैरवनाथ मोटे, डॉ. बालाजी राजोळे, डॉ. शिवाजी कदम, डॉ. रामेश्वर धप्पाधुळे, डॉ. सुर्यकांत बिराजदार, डॉ. पार्वती माने, डॉ. शिरीष देशमुख, बालाजी सगर, प्रविण पाटील, प्रकाश राठोड, फुगटे संजय, परमेश्वर कदम व विद्यार्थी उपस्थित होते.



### श्री महात्मा बसवेश्वर विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा

**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -**

श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय, उमरगा येथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या सुरेखा नारायणकर यांनी कुसुमाग्रज यांच्या साहित्यावर भाष्य करत मराठी भाषेचे वैभव वाढवणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. विविध साहित्यकृती व नाटकांची उदाहरणे देत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विषयाचे शिक्षक ज्ञानेश्वर शिरसागर होते. यावेळी मुख्याध्यापक नेताजी गायकवाड, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी काव्यवाचन, चित्रकला तसेच कुसुमाग्रजांच्या साहित्यावर आधारित सादरीकरण करून मराठी भाषेचा गौरव वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न केला. मराठीच्या जतन व संवर्धनासाठी विद्यार्थ्यांना शपथही देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय कोतकर यांनी केले, तर प्रास्ताविक सुनील बडगिरे यांनी मांडले.

# दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर वाढवावा : विद्याचरण कडवकर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -**

मराठी ही आपली मायभाषा असून तिचा अभिमान बाळगणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. शासनस्तरावर तसेच दैनंदिन व्यवहारात मराठीतून संवाद साधण्याची सवय सर्वांनी लावून घ्यावी. मराठी भाषेचा वापर जितका वाढेल तितकी भाषा अधिक समृद्ध होईल असे मत निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी व्यक्त केले.

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ 'कुसुमाग्रज' यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा गौरव दिन' जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालय, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा ग्रंथालय येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांच्या हस्ते कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण व दीपप्रज्वलन करून झाली. यावेळी ज्ञानकिरण सामाजिक संस्थेच्या विद्यार्थी दत्तक योजनेचा शुभारंभ करण्यात आला. या उपक्रमातून गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी स्वाती शेंडे, उपजिल्हाधिकारी श्रीकांत पाटील, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. दयानंद जटनुरे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) रविंद्र खंदारे, साहित्यिक राजेंद्र अत्रे, युवराज नळे, समाधान शिकेतोड, कवयित्री सुनिता गुंजाळ, भाग्यश्री देवकते, जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे, पत्रकार अनिल आगलावे आदी मान्यवर उपस्थित होते.जिल्हा ग्रंथालयात कुसुमाग्रज तसेच इतर मराठी साहित्यिकांच्या साहित्याचे विशेष ग्रंथ प्रदर्शन नागरिकांसाठी खुले असून साहित्यप्रेमींनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भैरवनाथ कानडे यांनी केले, तर महसूल सहाय्यक कल्पना काशिद यांनी विशेष परिश्रम घेतले.

विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी, शालेय विद्यार्थी, स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी, पत्रकार तसेच मराठी भाषा प्रेमी नागरिक उपस्थित होते.

#### पुस्तक प्रकाशन व विद्यार्थी दत्तक योजनेचा शुभारंभ

कार्यक्रमात जिल्हा मराठी भाषा समिती सदस्य समाधान शिकेतोड यांच्या मुलांना वाचतं लिहितं करताना या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच कवयित्री भाग्यश्री देवकते यांच्या शब्दप्रभा या कविता संग्रहाचेही अनावरण मान्यवरांच्या हस्ते झाले.

#### परिसंवादातून भाषा संवर्धनावर विचारमंथन...

मराठी भाषा संवर्धन, वाचन संस्कृती आणि नव्या पिढीमध्ये साहित्याविषयी आवड निर्माण करण्याच्या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. उपस्थित साहित्यिक व मान्यवरांनी मराठी भाषा टिकवण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज अधोरेखित केली.



कुसुमाग्रज जयंतीनिमित्त 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा

## जयप्रकाश विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -**

जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, रुईभर येथे मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य जयप्रकाश कोळगे होते. प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षक विकास क्षिरसागर व पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे उपस्थित होते.



यावेळी सहशिक्षक सुरेश रायजादे यांनी मराठी भाषा गौरव दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून ज्ञान, संस्कार, प्रबोधन आणि परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याचे सांगितले. मराठी भाषेचा इतिहास समृद्ध व गौरवशाली असून तिच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक वारशाचे जतन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

२७ फेब्रुवारी हा ज्ञानपीठ व पद्मभूषण पुरस्कार विजेते ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांच्या साहित्यिक योगदानाचा गौरव करण्यासाठी हा दिवस साजरा करण्यात येतो. केंद्र सरकारने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात दर्जा प्रदान केला असून, मराठीचा वापर दैनंदिन जीवनात अधिकाधिक व्हावा, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

कार्यक्रमास डॉ. आंबेडकर बाल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, माजी जि.प. सदस्य रामदास आण्णा कोळगे, माजी ग्रा.प. सदस्य राजनारायण कोळगे, प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके, श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे, इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रशांत कोळगे यांनी केले तर आभार प्रदर्शन गणेश शेटे यांनी मानले.

## पाथरूड येथे घरफोडी; ३८ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२७ फेब्रुवारी -**

भुम तालुक्यातील पाथरूड येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी भुम पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सावित्रा उल पवार (वय ४० वर्षे, रा. पाथरूड ता. भुम जि. धाराशिव) या उसतोडीच्या कामानिमित्त बाहेरगावी गेल्या होत्या. दरम्यान दि.२२ फेब्रुवारी रोजी अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील लोखंडी कपाट फोडून त्यामधील सोन्या-चांदीचे दागिने, घरउपयोगी साहित्य तसेच १ हजार ५०० रुपयांची रोख रक्कम असा एकूण अंदाजे ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला.


सदर प्रकरणी सावित्रा पवार यांनी दि.२५ रोजी दिलेल्या खबरेवरून भुम पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

## चिंचपूर बु. येथे आफू लागवड; ८० हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -**

परंडा तालुक्यातील चिंचपूर बु. शिवारात बेकायदेशीररीत्या आफूची लागवड करणाऱ्यांविरुद्ध आंबी पोलीस ठाणे यांच्या पथकाने धडक कारवाई केली आहे.

दि.२४ फेब्रुवारी रोजी दुपारी सुमारे १५.१० वाजण्याच्या सुमारास आंबी पोलीस ठाणे हद्दीत चिंचपूर बु. (ता. परंडा, जि. धाराशिव) येथील शिवारात छापा टाकण्यात आला.




या कारवाईदरम्यान आरोपी लक्ष्मण कोंडीबा झांबरे (वय ८१), संजय मारुती झांबरे (वय ४५) व महेश बापुसाहेब झांबरे (वय २५, सर्व रा. चिंचपूर बु. ता. परंडा) हे स्वतःच्या फायद्यासाठी विनापरवाना आफूची लागवड व जोपासना करताना आढळून आले.

पोलीसांनी घटनास्थळावरून एकूण ५ किलो ३६६ ग्रॅम वजनाची अंदाजे ८० हजार ८०० रुपयांची आफूची झाडे जप्त केली. तसेच जुगार साहित्य व रोख रक्कमही हस्तगत करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

या प्रकरणी संबंधित तिघांविरुद्ध आंबी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## नळदुर्ग येथे ४ ते ७ मार्चदरम्यान शिव-बसव-राणा जन्मोत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ फेब्रुवारी -**

नळदुर्ग येथे प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर व महाराणा प्रताप यांच्या जयंती उत्साहात एकत्रित साजऱ्या करण्यात येणार आहेत. हा जन्मोत्सव ४ ते ७ मार्च २०२६ दरम्यान विविध कार्यक्रमांनी रंगणार आहे.



समितीच्या नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली असून अध्यक्षपदी प्रमोद कुलकर्णी, उपाध्यक्षपदी संदीप गायकवाड व ओंकार कदम यांची निवड झाली आहे. कोषाध्यक्ष संतोष पुदाले, सांस्कृतिक प्रमुख परमेश्वर जाधव, सल्लागार शरद बागल, सरदारसिंग ठाकूर, राजकुमार वैद्य, मिरवणूक प्रमुख अमित शेंडगे, शाम कनकधर व प्रविण चव्हाण यांचीही निवड करण्यात आली.

४ मार्च रोजी लोकमान्य वाचनालय येथून दुपारी ४ वाजता भव्य शोभायात्रा. तीनही महापुरुषांच्या वेशभूषेत घोड्यावर स्वार बालकलाकार हे प्रमुख आकर्षण. सायंकाळी ७ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत प्रतिमांची स्थापना. ६ मार्च रोजी कृष्णाई उळेकर यांचा पोवाडा-भारूड-लोकगीत कार्यक्रम. ७ मार्च रोजी शहरातून तीनही महापुरुषांच्या प्रतिमांची भव्य मिरवणूक. महाकाल, अघोरी नृत्य, शिवतांडव व भस्म आरती ही विशेष आकर्षणे.

या सर्व कार्यक्रमांना शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## दाऊदपूर येथे 'जल अर्पण' उत्साहात; जल जीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना कार्यान्वित



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -**

धाराशिव तालुक्यातील दाऊदपूर येथे जल जीवन मिशन अंतर्गत पूर्ण झालेल्या पाणीपुरवठा योजनेचा जल अर्पण दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तुकाराम भालके, धाराशिवचे गटविकास अधिकारी कांबळे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील काटकर, म.जि.प.चे कार्यकारी अभियंता हेमंत नागदे, तसेच उपअभियंते, कनिष्ठ अभियंते, टाटा अभियंते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात योजनेच्या पायाभूत विहिरीजवळ मान्यवरांच्या हस्ते कलशपूजन करून करण्यात आली. त्यानंतर जि.प. प्रशालेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह अभंग गात प्रभातफेरी काढण्यात आली. ही फेरी जि.प. आरोग्य केंद्राच्या प्रांगणात पोहोचल्यानंतर कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात झाली.

कनिष्ठ अभियंता अश्विनी साळवे यांनी योजनेची प्रस्तावना व उद्दिष्टे स्पष्ट केली. या योजनेअंतर्गत ८ मीटर व्यासाची पायाभूत विहीर, आयव्ही विहीर, पंपिंग मशिनरी, क्लोरीन यंत्रणा, ७९५ मीटर उर्ध्ववाहिनी, ३१३० मीटर वितरण नलिका व १२५ घरगुती नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. योजनेची सर्व उपांगे पूर्ण करून चाचणीनंतर ती कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. तसेच पाणी व स्वच्छता समितीतील पाच महिलांना पाणी गुणवत्ता तपासणीसाठी एफटीके किटचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी योजना हस्तांतरणानंतर तिची देखभाल ही ग्रामस्थांची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. गटविकास अधिकाऱ्यांनीही पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहन केले.

ग्रामविकास अधिकाऱ्यांनी संबंधित अभियंत्यांचे आभार मानले. सरपंचांनी भविष्यात योजनेची योग्य देखभाल व दुरुस्ती करण्याचे आश्वासन दिले. योजना हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्याची घोषणा करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## खुदावाडी येथे सोमवारी जिल्हास्तरीय ग्रंथालय अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.२७ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील खुदावाडी येथे धाराशिव जिल्हा ग्रंथालय संघ व शेतकरी वाचनालयाच्या वतीने १ मार्च रोजी जिल्हास्तरीय ग्रंथालय अधिवेशन मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर येथील बसवेश्वर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य कमलाकर कबाडे हे राहणार असून उद्घाटक म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर उपस्थित राहतील. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य सोमनाथ रोडे, डॉ. सतीश कदम, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, अधीक्षक ग्रंथालय संचालक अनिल बाविस्कर, जिल्हा ग्रंथालय अधिकारी हनुमान ढाकणे, व.ग. सूर्यवंशी, प्रा. मनोहर कबाडे तसेच सरपंच सरोजिनी कबाडे उपस्थित राहणार आहेत. या अधिवेशनात नाव नोंदणी, ग्रंथ दिंडी, पुस्तक प्रदर्शन, डिजिटल युगातील वाचन संस्कृतीसमोरील आव्हाने व उपाय या विषयावर परिसंवाद, ग्रामीण वाचनालयांना आर्थिक सहाय्याबाबत चर्चा तसेच उत्कृष्ट ग्रंथपाल व कर्मचाऱ्यांचा सत्कार असे विविध कार्यक्रम होणार आहेत.

ज्येष्ठ समाजसेवक डॉ. सिद्रामप्पा खजूरे व कार्यवाह वसंत चिंचोले यांनी जिल्ह्यातील वाचनप्रेमींनी उपस्थित राहावे, असे आवाहन केले आहे.

#### शेतकरी वाचनालय खुदावाडीचा सुवर्णमहोत्सव...

खुदावाडी येथील शेतकरी वाचनालयाची स्थापना १९७५ साली झाली असून यंदा संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. ५० वर्षांपूर्वी लावलेले हे रोपटे आज वटवृक्षात रूपांतरित झाले आहे. ग्रामस्वच्छता अभियानात गावाला पुरस्कार मिळवून देण्यात वाचनालयाचा मोलाचा वाटा आहे. तत्कालीन ग्रंथपाल तीप्पण्णा सालगे, विद्यमान कार्यवाह वसंत चिंचोले, डॉ. सिद्रामप्पा खजूरे, सरपंच सरोजिनी कबाडे व ग्रामस्थांच्या योगदानामुळे हे वाचनालय ग्रामीण भागातील दीपस्तंभ ठरले आहे.

### छोटी जाहिरात...

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME FROM..... MOGAL ISMAIL ANWAR TO NEW NAME AS -MOGAL ISMAIL ABUBAKAR

OLD NAME-MOGAL ISMAIL ANWAR

NEW NAME- **MOGAL ISMAIL ABUBAK AR**

ADDRESS : MANDAI PETH, PARANDA POST. PARANDA TAL PARANDA DIST SMANABAD, MAHARASHTRA PIN - 413502

### जाहीर प्रगटन
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापुर यांचे कार्यालय**

प्रकरण क्र.८५४/२०२५

**प्रकरण: - जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत**

अर्जदार **गितांजली बालाजी आवारे रा. सासुरे ता. बार्शी जि. सोलापूर** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांचा **मुलगा नामे रुद्रांश बालाजी आवारे** यांचा जन्म दिनांक ०७.१२.२०२२ रोजी गंधोरा येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक २४/०२/२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

शिक्का तहसील कार्यालय

स्वाक्षरित/-
(प्रियंका लोखंडे)
नायब तहसिलदार (महसुल)
तहसिल कार्याल, तुळजापुर

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# स्वच्छता कामगारांचे काम बंद आंदोलन ; शहरवासीयांना करावा लागला घाणीचा सामना



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ फेब्रूवारी-**

शहर स्वच्छतेचे काम पाहणाऱ्या अमृत कंपनीच्या ठेकेदाराने शंभरहून अधिक कामगारांना कामावरून काढल्याने आणि विविध मागण्या पूर्ण न केल्याने स्वच्छता विभागाच्या कर्मचाऱ्यांनी थेट काम बंद आंदोलन केल्याने शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढिगारे जैसे थेच राहिले असुन आपल्या विविध मागण्यांसाठी कामगारांनी आज मनपासमोर आंदोलन केले.

गुरुवारी भाजपाचे नेते माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या उपस्थितीत महापौर कविता मुळे यांनी शहर विकासाचा १०० दिवसांचा कृती आराखडा घोषित केला आहे. या कृती आराखड्यात स्वच्छतेला प्रथम प्राधान्य असल्याचे महापौर कविता मुळे यांनी स्पष्ट केले होते. मात्र पहिल्याच दिवशी अमृत कंपनीने कामगारांच्या मागण्या मान्य न केल्याने शुक्रवारी एकही कामगार स्वच्छतेसाठी रस्त्यावर उतरला नाही. या कामगारांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. कामगार युनियनच्या माध्यमातून हे आंदोलन केले जात आहे. अमृत कंपनीच्या शिवाजीनगर येथील वाहन तळावर हे कर्मचारी शुक्रवारी सकाळी एकत्रित झाले दुपारी बारा वाजता महापालिकेच्या कार्यालयासमोर कामगार युनियनचे अध्यक्ष गणेश शिंगे यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करण्यात आले.

कामगार युनियनने या आंदोलनावर संदर्भात महापौरांसह महापालिका अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला होता मात्र त्यावर कोणतीही चर्चा झाली नाही तोडगा ही निघाला नाही. त्यामुळे आज शुक्रवारपासून शहरात काम बंद आंदोलन करण्यात आले असुन याचा फटका शहरवासीयना बसला आहे. शहरवासीयांना घाणीचा सामना करावा लागत आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'शतक' या चित्रपटाचा मोफत शो

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २७ फेब्रूवारी-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघा च्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने निर्मित 'शतक' या चित्रपटाचा मोफत शो धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर व मनोज बिर्ला यांच्या संयुक्त विद्यमाने पीव्हीआर सिनेमा, कौठा नांदेड येथे उत्साहात आयोजित करण्यात आला. या विशेष प्रदर्शनाला स्वयंसेवक व भाजप कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सभागृह खचाखच भरले.

शहर संघचालक डॉ. गोपाल राठी यांच्या हस्ते शोचे उद्घाटन करण्यात आले. प्रमुख अतिथी म्हणून सनतकुमार महाजन, माणिक भोसले, चंद्रकांत देगावकर, प्रभाकर महाजन, राजेश देशमुख, दत्ता कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित सर्व स्वयंसेवक व भाजप कार्यकर्त्यांचे औक्षण करण्यात आले. संतोष परळीकर यांच्या वतीने पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले.



प्रवेशद्वारावर संध्या छापरवाल, सविता काबरा, अर्चना शर्मा व उषा गायकवाड यांनी आकर्षक भव्य रांगोळी काढून वातावरण अधिक मंगलमय केले. बालाजीसिंह ठाकूर यांनी उपस्थितांसाठी बिसलरी पाण्याच्या बाटल्यांची व्यवस्था केली होती. संयोजकांनी सर्वांसाठी सिनेमा तिकिटे व पॉपकॉर्नची मोफत व्यवस्था केली होती. राष्ट्रगीताने चित्रपटाची सुरुवात झाली. चित्रपट सर्वांनी अत्यंत आवडीने व उत्साहात पाहिला.

समारोप प्रसंगी ॲड. दिलीप ठाकूर यांनी जाहीर केले की, 'केरला स्टोरी पार्ट टू' हा चित्रपट लवकरच नांदेडमध्ये प्रदर्शित होणार असून त्याचे दहा विशेष शो मुलींसाठी मोफत आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमासाठी सुमारे चार लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. मुलींमध्ये जागृती निर्माण व्हावी तसेच हिंदू धर्म ऐक्यासाठी कार्य करणाऱ्या दानशूर नागरिकांनी या उपक्रमात सढळ हाताने सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. मदत करणाऱ्यांची नावे समाजमाध्यमे व वृत्तपत्रांद्वारे जाहीर करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी राजेशसिंह ठाकूर, संतोष भारती, अरुण काबरा, गिरीश पटवारी, महेंद्र शिंदे, संदीप छापरवाल, सूर्यकांत कदम, प्रसाद जोशी, कृष्णा बेरळीकर, डॉ. राजेश उंबरकर, राजन जोजारे, विलास जोगदंड, जयश्री ठाकूर, प्रणिता कुलकर्णी, बिना चौहान, माला शर्मा आदींनी परिश्रम घेतले.

# बंजारा भवन उभारणीची मागणी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २७ फेब्रूवारी-**

बंजारा समाजाचा विकास केवळ आश्वासनांवर न राहता प्रत्यक्ष कृतीतून व्हायला हवा. किनवटमध्ये 'बंजारा भवन' उभारणे ही काळाची गरज आहे, असे सचिन नाईक यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. समाजाच्या शैक्षणिक आणि सामाजिक उन्नतीसाठी ठोस निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.किनवट येथे बंजारा समाजाचे आराध्य दैवत संत सेवालाल महाराज यांच्या नावाने सुसज्ज 'बंजारा भवन' उभारण्यासाठी नगर परिषदेकडून जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी मान्यवरांसमोर केली.

प्रस्तावित भवनामध्ये विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह, स्पर्धा परीक्षांसाठी वाचनालय, संगणक प्रशिक्षण केंद्र तसेच समाजाच्या विविध उपक्रमांसाठी सभागृहाची सुविधा असावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# रेबीज इंजेक्शन पुरवठ्याचे आरोग्य उपसंचालकांनी दिले आदेश

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २७ फेब्रूवारी-**

येथील उपजिल्हा रुग्णालयात गेल्या काही दिवसांपासून रेबीज प्रतिबंधक लसीचा मोठा तुटवडा निर्माण झाला असून, यामुळे रुग्णांची मोठी ससेहोलपट होत आहे. या गंभीर प्रश्नावर अंकुश भालेराव यांनी आक्रमक पवित्रा घेत थेट वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा केला. यावर लातूर विभागाच्या आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांनी या विषयात जातीने लक्ष घालून तातडीने लस पुरवठा करण्याचे आश्वासन दिले आहे.



अंकुश भालेराव यांच्या पाठपुराव्याला यश

किनवट शहर आणि ग्रामीण भागात मोकाट कुत्र्यांचा हैदोस वाढला आहे. दररोज अनेक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या घटना घडत आहेत. मात्र, उपजिल्हा रुग्णालयात लस उपलब्ध नसल्याने गरीब रुग्णांना खाजगी मेडिकलमधून महागडी इंजेक्शन खरेदी करावी लागत होती. यामुळे मजुरी करणाऱ्या कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले होते.

**अंकुश भालेराव यांचा पाठपुरावा**

या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत अंकुश भालेराव यांनी लातूर येथील आरोग्य उपसंचालक कार्यालयाशी संपर्क साधला. त्यांनी रुग्णांच्या होत असलेल्या हालांची माहिती दिली आणि तातडीने औषध पुरवठा करण्याची मागणी लावून धरली.

**आरोग्य उपसंचालक रेखा गायकवाड यांचे आश्वासन**

अंकुश भालेराव यांनी या विषयावर आरोग्य उपसंचालक डॉ. रेखा गायकवाड यांच्याशी फोनवर चर्चा केली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, डॉ. गायकवाड यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. या प्रकरणात मी स्वतः जातीने लक्ष घालत असून, किनवट उपजिल्हा रुग्णालयाला आवश्यक असलेल्या रेबीज इंजेक्शनचा पुरवठा तातडीने करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले आहेत, असे त्यांनी फोनवर बोलताना स्पष्ट केले.

**रुग्णांना दिलासा मिळणार**

वरिष्ठ स्तरावरून थेट आदेश मिळाल्यामुळे आता किनवट रुग्णालयात लवकरच लसीचा साठा उपलब्ध होणार आहे. यामुळे शेकडो गोरगरीब रुग्णांना मोठा दिलासा मिळणार असून, भालेराव यांनी केलेल्या या पाठपुराव्याचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

प्रशासनाने दिलेल्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी व्हावी. लस उपलब्ध होईपर्यंत आम्ही यावर लक्ष ठेवून आहोत. गोरगरीब रुग्णांना औषधांविना परत जावे लागू नये, हीच आमची भूमिका असल्याचे अंकुश भालेराव म्हणाले.

# सामूहिक विवाह मेळाव्यासाठी नाव नोंदणीचे आ. कोहळीकर यांचे आवाहन

**हदगाव** -हदगांव- हिमायतगर विधानसभा मतदारसंघांचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या



जन्मशताब्दी वर्षानिमित्त हदगावहिमायतनगर विधानसभा मतदारसंघात १०० जोडप्यांचा भव्य सामूहिक विवाह मेळावा आयोजित केला आहे. हा मेळावा दि. २६ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात येणार असून, पात्र वधू-वरांनी नाव नोंदणी करून या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार कोहळीकर यांनी केले आहे. मतदारसंघातील शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी व गरजू कुटुंबांवर मुला-मुलींच्या विवाहासाठी मोठा आर्थिक बोजा पडतो. लग्नासाठी लाखो रुपयांचा खर्च करताना अनेकांना कर्जबाजारी व्हावे लागते. काही वेळा मानसिक ताणतणाव आणि आर्थिक अडचणींमुळे गंभीर परिणामही भोगावे लागतात. या पार्श्वभूमीवर सामूहिक विवाह ही काळाची गरज असून, कमी खर्चात आणि सामाजिक एकोप्याने विवाह सोहळा पार पाडता येतो, असे आमदार कदम यांनी नमूद केले.

# भोकर शहरातील अवैध दारु विक्री बंद करण्याची बार अँन्ड रेस्टॉरंट असोसिएशनची मागणी

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. २७ फेब्रूवारी-**

शहरातील अवैध दारू विक्री त्वरित थांबवण्याची मागणी भोकर बार अँन्ड रेस्टॉरंट असोसिएशन तर्फे उत्पादन शुल्क अधिकारी नांदेड यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

भोकर शहरात मोठ्या प्रमाणात मटन खानावळ व धाब्याची संख्या वाढली आहे. सदर ठिकाणी ग्राहकांना जेवण उपलब्ध करून देण्यास काहीच आक्षेप नाही. परंतु मटन खानावळ व धाबा चालकांकडुन ग्राहकांना अवैधरित्या दारु विक्री केली जात असल्याने ज्याचा अर्थिक परिणाम शहरातील अधिकृत बार व रेस्टॉरंट चालकांवर मोठ्या प्रमाणात होत आहे.शहरात सदर प्रकार खुलेआम पणे चालू असताना संबधित विभागा कडून कोणतीही कारवाई होत नसल्याने बार चालकांना मोठ्या अर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. परवाना धारक बार व रेस्टॉरंट चालक वर्षा काठी मोठ्या प्रमाणात शासनाला महसूल भरून स्वतः सोबत कर्मचाऱ्यांचा उदरनिर्वाह चालवत असताना वाईन मार्ट वरुन दारुची खरेदी करून अधिकचे थोडे बहुत पैसे आकारत सदर मटन खानावळ व धाबे चालक कोणताही शासकीय कर न भरता आपला व्यवसाय जोमाने चालवत असल्याने शहरातील बार अर्थिक डबघाईला आल्याचे चित्र निर्माण झाले आहे. सदर अवैध दारु विक्रीला वेळीच आवर न घातल्यास बार चालकांना कर्मचारी व इतर खर्चिक बाबींचा बोझा चालवणे शक्य नसल्याने व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे. यामुळे बार वर काम करणाऱ्या अनेक कर्मचाऱ्यांवर बेरोजगारी चा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने शहरातील मटन खानावळ व धाब्यावरील अवैध दारु विक्री वर योग्य ती कारवाई करून त्वरित विक्री थांबवण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर परवाना धारक बार व रेस्टॉरंट चालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अर्धशतकाची प्रतीक्षा संपली! राज्य मार्ग २६४ चे नूतनीकरण वेगात

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. २७ फेब्रूवारी-**

नायगाव ते उमरी या दोन तालुक्यांना जोडणारा राज्य मार्ग क्रमांक २६४ अखेर नव्या रुपात साकारत आहे. तब्बल पन्नास वर्षांपासून दळणवळणाचा कणा मानला जाणारा हा २९ किलोमीटरचा मार्ग खड्डे, तडे, धुळीचे ढग आणि वारंवार होणारे अपघात यामुळे नागरिकांच्या संतापाचा विषय ठरला होता. मात्र आता या मार्गाच्या नूतनीकरणाचे काम वेगाने आणि दर्जेदार पद्धतीने सुरू असून परिसरात समाधानाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ मार्फत राज्य मार्ग २६४ (ईपीसी एनडी-२, ३३-अ) अंतर्गत उमरी, तळेगाव, बळेगाव, सातेगाव, ईळीमाळ, कुंटूर, कोकलेगाव, शेळगाव मार्गे नायगाव हेडगेवार चौकापर्यंत दोन पदरी सुसज्ज रस्ता मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे वर्षानुवर्षे रखडलेल्या विकासाला गती मिळाली असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

**अत्याधुनिक यंत्रसामग्रीचा वापर; कामात वेग आणि गुणवत्ता**

हे महत्त्वाकांक्षी काम नामांकित राजसेतू कंपनी कडे सोपविण्यात आले आहे. कंपनीकडून अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या साहाय्याने काम जोमात सुरू असून मजबूत बांधकाम, शास्त्रोक्त पद्धतीने बेस लेयर टाकणे, योग्य दाबदाबणी आणि गुणवत्तेची काटेकोर तपासणी या सर्व बाबींवर विशेष भर दिला जात आहे. त्यामुळे हा रस्ता केवळ देखणा नव्हे, तर दीर्घकाळ टिकणारा ठरेल, असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

**दहा वर्षांची देखभाल; दीर्घकालीन दिलासा**

विशेष म्हणजे या प्रकल्पांतर्गत पुढील दहा वर्षे देखभाल व दुरुस्तीची



जबाबदारीही संबंधित कंपनीकडेच राहणार आहे. त्यामुळे रस्ता पुन्हा दुरवस्थेत जाणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नागरिकांना दीर्घकालीन सुरक्षित आणि सुकर प्रवासाची हमी मिळणार आहे.

व्यापारी, शेतकरी, विद्यार्थी यांना मोठा लाभ

या मार्गाच्या उभारणीमुळे वाहतूक सुरळीत होणार असून व्यापारी वर्गाला मालवाहतुकीत गती मिळेल. शेतकऱ्यांना शेतीमाल बाजारपेठेत वेळेत पोहोचविणे सुलभ होईल. विद्यार्थी आणि रोजंदारी कामगार यांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सोयीस्कर होणार आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

**त्रासदायक मार्ग' ते 'सुरक्षित महामार्ग' परिवर्तनाची नवी वाट**

एकेकाळी वाहनचालकांसाठी डोकेदुखी ठरलेला नायगाव ते उमरी मार्ग आता मजबूत, रुंद आणि सुरक्षित महामार्गाच्या दिशेने वाटचाल करत आहे. विकासाच्या या टप्प्यामुळे संपूर्ण परिसराच्या प्रगतीला नवे पंख लाभणार आहेत. नागरिकांकडून राजसेतू कंपनीच्या कार्यपद्धतीचे आणि प्रशासनाच्या सकारात्मक भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत असून, अर्धशतकाची प्रतीक्षा अखेर फळाला आली, अशा समाधानकारक प्रतिक्रिया उमटत आहेत.

# बाजार समितीचे सचिव अर्जीत रजेवर तर उपसभापती निवडीसाठी १३ संचालकाने सहमती दिल्याची चर्चा

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २७ फेब्रूवारी-**

कृर्षी उत्पन्न बाजार समितीने सहारा स्टेडीयम व मोंढा परिसरात व्यापाऱ्याना मोकळी जागा देण्यासाठी सर्व संचालक मंडळ सहमत झाले. त्या जागेवर व्यापाऱ्यांनी पत्रा शेडचे दुकाने तयार करुन व्यापाऱ्यांनी व्यवसाय करावा व त्यातून मार्केट कमेटीला उत्पन्न मिळेल हा उद्देश असताना या ठिकाणी भलतेच घडले आहे. संचालक व व्यापारी यांच्यात चर्चा झाली. काही संचालकांनी दुकाने रद्द तर काहींनी चौकशी करण्याची मागणी केली. या प्रकरणावरुन सचिव अर्जीत रजेवर गेले तर नविन उपसभापती निवडीसाठी १३ संचालकानी सहमती दर्शविल्याची चर्चा होती परंतु प्रकरणं थंड झाले.

लोहा कृउबा समितीने ठराव घेऊन जे व्यापारी भाड्याच्या दुकानात राहुन दर वर्षी आपल्या व्यवसायातुन मार्केटेची फिस भरुन बाजार समितीचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करतात आशा व्यापाऱ्यांना मोकळ्या जागेवर दुकाने देऊन बाजार पेठ वाढवण्याचे एकमत झाले. ठरल्या प्रमाणे प्रक्रिया झाली पाहिजे होती पण तसे न होता, पदावर बसलेल्या पदाधिकारी व सचिवाने वशिलेबाजीने व्यापाऱ्यांना दुकाने दिले. ज्या व्यापाऱ्याकडे परवाने आहेत पण लोहा व मोंढा परिसरात आडत् दुकान नाहीत, ज्या व्यापाऱ्याचे मोंढा बाजार पेठेत दुकान व शहरात कुठेही पानपट्टी नाही. अशा व्यापऱ्यांना मोकळ्या जागेवर दुकाने दिली. काही व्यापाऱ्यांनी सकाळी परवान्यासाठी अर्ज केला त्यांना त्याच दिवशी संध्याकाळी दुकानाची मोकळी जागा दिली. जे व्यापारी मार्केट फीस भरतात आणि १० ते १५ वर्षापासुन प्रत्येक बैठकीत आम्हाला दुकानासाठी जागा द्या अशी मागणी करतात असे व्यापारी मोकळ्या जागेपासुन वंचित राहिले .ज्या व्यापाऱ्यानी व्यवसायाला पुढे करुन मोकळी जागा घेतली. त्या जागेवर टिन पत्राचे दुकान तयार केले. मार्केट कमिटीचा जो उदेश होता, त्या उद्देशाने मोकळी जागा दिली, पण फायदा कशासाठी होत आहे याची वरिष्ठाने चौकशी करावी अशी ही मागणी होत आहे.

कृर्षी उत्पन्न बाजार समितीमध्ये ४० गाळे आहेत त्या गाळ्यांला नाममात्र वार्षीक भाडे आहे. आजच्या घडीला लोहा शहर वाढते शहर म्हणून झपाट्याने वाढत आहे. त्याच प्रमाणात बाजार पेठेचा सुध्दा विस्तार मोठा झपाट्याने वाढत आहे. बाजार मोंढा परिसराच्या बाहेरील खाजगी दुकानाना लाख व दोन लाख पटीत वार्षिक भाडे आहेत.

आज घडीला मोंढ्यातील बाजार पेठेत ४० गाळे धारकापैकी मोंढा परिसरातील १० ते १५ व्यापाऱ्यानी आडत दुकानं बंद करुन ते गाळे गोदामासाठी भाड्याने दिले आहेत. मार्केट कमेटी एक गाळ्याला वार्षीक भाडे कमी शुल्क आकारते, तो गाळे धारक बाहेरच्या दुकानदाराला माल ठेवण्यासाठी लाखो रुपयांचे भाडे घेऊन गाळे भाड्याने देत आहे, अशा व्यापाऱ्यांवर परवाना निलंबनाचा ठराव का घेऊ नये असे बोलले जाते.

उपसभापतीची ठरल्या प्रमाणे मुदत संपली आहे. दुसऱ्याही संचालकला उपसभापती

# बाबा सोनापीर उर्स आनंदात साजरा करण्याचे आवाहन

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २७ फेब्रूवारी-**

शहरातील सुफी संत बाबा सोनापीर दर्गाह येथे दि. ०५ ते १० मार्च पर्यंत साजरा करण्यात येणाऱ्या उर्स यात्रोत्सवानिमित्त तहसील कार्यालयात तहसीलदार अभिजीत जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आढावा बैठक पार पडली. या बैठकीत तहसीलदार अभिजित जगताप यांनी बाबा सोनापीर दर्गा येथे बाबा सोनापीर यांच्या दर्शनासाठी येणाऱ्या सर्व भाविकांनी उर्स यात्रोत्सव मोठ्या आनंदाने साजरा करावा आणि त्यादृष्टीने प्रशासनाच्या सर्व विभागांनी भाविकांना कुठलाही त्रास होऊ नये याची दक्षता घ्यावी, असे आवाहन केले.

आढावा बैठकीत तहसीलदार अभिजीत जगताप यांचेसह मुख्याधिकारी विवेक कांदे, सपोनि शरद घोडके, नायब तहसीलदार कैलास जेठे, नायब तहसीलदार अरुणा सूर्यवंशी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.राजेश माचेवार,मराविविकंचे राहुल शेंडे, आरोग्य विभागाचे डॉ. अभिजित आंबेकर, वनपाल एम.एन. कत्तुलवार, सज्जादा नशीन साजिदउल्ला जागीरदार, मुजावर बाबर अहमद फकीर मोहम्मद, साबांचे के.एस.राठोड, एस. जी. मुखेडकर महसूल सहाय्यक, सी.पी बाबर,शेख अकबर भाई ताहेर भाई ठेकेदार, बीएसएनएलचे जावेद भाई आदी. उपस्थित होते.या सर्वांनी बैठकीनंतर बाबा सोनापीर दर्गाह येथे जाऊन भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधाची पाहणी करून तहसीलदार अभिजीत जगताप यांनी योग्य त्या सूचना देत उर्स महोत्सव आनंदात साजरा करावा असे आवाहन केले.यावेळी मुजावर बाबर अहमद फकीर मोहम्मद यांच्याकडून आलेल्या सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

# आ. राजेश पवार यांच्या जनता दरबाराचा इम्पॅक्ट!

## उमरी तालुक्याच्या ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचे अखेर निलंबन

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २७ फेब्रूवारी-**

उमरी पंचायत समिती मधील घरकुल योजनेचे बिले काढतो म्हणून हप्ते मागणाऱ्या ग्रामिण गृहनिर्माण अभियंता भाग्यश्री जाधव यांना अखेर निलंबीत करण्यात आले आहे .



उमरी तालुक्यातील रावधानोरा येथे नायगाव मतदार संघाचे आमदार राजेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली दि. ४ फेब्रुवारी रोजी झालेल्या जनता दरबारामध्ये अनेक नागरिकांनी उमरी पंचायत समिती येथे कार्यरत ग्रामीण गृहनिर्माण अभियंता भाग्यश्री एकनाथ जाधव यांच्या ऐवजी त्यांचे पती हेच पूर्णवेळ कामकाज पाहत असल्याची गंभीर बाब निदर्शनास आणून दिली. घरकुल बांधकाम स्थळावर जाऊन नोंदणी व तपासणी करण्यासोबतच सर्वसामान्य व गोरगरीब लाभार्थ्यांकडून घरकुल मंजुरी, तपासणी व हप्ते टाकण्यासाठी आर्थिक देवाणघेवाण (लाच) केल्याचा आरोप पुराव्यासह जनता दरबारात आमदार मोहदयाकडे करण्यात आले होते. ही अत्यंत गंभीर बाब आहे हे आमदार राजेश पवार यांच्या लक्षात येताच, गटविकास अधिकारी - उमरी यांना सूचना देऊन सदरील व्यक्तीचे निलंबन करण्याच्या सूचना दिल्या व जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देखील ही बाब अवगत करुन देण्याच्या सूचना दिल्या. त्याचप्रमाणे राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांना देखील भेटून याबाबत लेखी तक्रार दिली.

गटविकास अधिकारी यांच्याकडे देखील सदरहू भाग्यश्री यांचे पती अशोक हे कामासाठी लाच मागत असल्याच्या काही तक्रारी नागरिकांनी यापूर्वीच केल्या होत्या, परंतू त्यांनी यावर कसलही कारवाई केली नाही. अखेरीस २३ फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - नांदेड यांना विशेष पत्र आमदार राजेश पवार यांनी देवून हा प्रकार स्वत: अवगत करुन दिला.

भाग्यश्री एकनाध जाधव यांचे तत्काळ निलंबन करावे, भ्रष्टाचारी प्रवृत्तींना पाठीशी घालणाऱ्या गटविकास अधिकारी, उमरी यांचे देखील निलंबन करावे, जिल्हा परिषदेमार्फत दोषींवर गुन्हे दाखल करावेत, कार्यवाहीचा अहवाल त्वरित सादर करावा अशी मागणी केली आहे त्या अनुषंगाने अखेरीस दि. २६ फेब्रुवारी रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - नांदेड यांनी ग्रामीण गृहनिर्माण अभियंता कंत्राट असलेल्या सीएससी-ई-गव्हर्नन्स सर्व्हिसेस इंडिया लि.यांना पत्राद्वारे भाग्यश्री एकनाथ जाधव यांना कार्यमुक्त करण्याचे आदेश दिले आहेत.

**जनतेची पिळवणूक करणाऱ्या अधिकारी - कर्मचाऱ्यावर कारवाई होणार: आ.पवार**

नायगाव विधानसभा मतदारसंघातील कोणत्याही विभागाच्या अधिकारी -कर्मचारी सर्वसामान्य नागरिकाची आर्थिक पिळवणूक केली अथवा कामात दिरंगाई केली तर त्यांच्यावर यापुढेही कारवाई करण्यात येणार आहे. जनतेच्या हितास माझे नेहमी प्राधान्य असून अधिका-यांबाबत काही तक्रारी असल्यास नागरिकांनी मला त्या कळवाव्यात, असे ही आव्हाण आमदार राजेश पवार यांनी केले आहे .



## थोडक्यात...

### एण्ड टीव्हीवरील 'हे भगवान – कितना बदल गया इन्सान!' मध्ये अक्षया नाईकची एन्ट्री

**छत्रपती संभाजीनगर :** हे भगवान – कितना बदल गया इन्सान! या मालिकेत अभिनेत्री अक्षया नाईक ईनाची भूमिका साकारणार आहेत. विनोद, भावना आणि आध्यात्मिकतेचा समतोल साधणाऱ्या या कथेत त्या महेश शर्मांच्या धाकट्या मुलीच्या भूमिकेत दिसतील. जवळपास दोन वर्षांनंतर त्या हिंदी टेलिव्हिजनवर पुनरागमन करत असून, ही भूमिका त्यांच्यासाठी वेगळी आणि उत्साहवर्धक असल्याचे त्यांनी सांगितले. ईना ही उत्साही, स्वावलंबी आणि आशावादी तरुणी असून कुटुंबातील नात्यांमधील आधुनिकता आणि पारंपरिक मूल्यांचा संगम प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. मालिका लवकरच एण्ड टीव्हीवर प्रसारित होणार आहे.

### 'लक्ष्मी निवास'च्या बँकॉक शूटमुळे झी टीव्हीचा बिग कॅनवास विस्तार

**छत्रपती संभाजीनगर :** लक्ष्मी निवास मालिकेतील महत्त्वपूर्ण प्रसंगासाठी झी टीव्हीने बँकॉकमध्ये भव्य शूटिंग केले आहे. कथानकात भूमिकाचा वाढदिवस राजकडून खास सरप्राइज स्वरूपात साजरा केला जातो, ज्यात प्रायव्हेट जेट आणि क्रूझवरील दृश्यांचा समावेश आहे. आंतरराष्ट्रीय लोकेशनवर चित्रीकरण करून कथेला वास्तवता आणि भव्यता देण्याचा धोरणात्मक निर्णय वाहिनीने घेतला. कलाकारांनी हा अनुभव संस्मरणीय असल्याचे सांगितले. उच्च निर्मितीमूल्य आणि भावनिक गुंतवणुकीचा समतोल राखत मालिकेने प्रेक्षकांसाठी नवे दृश्य मानदंड स्थापित केले आहेत. मालिका सोमवार ते शुक्रवार रात्री ८ वाजता प्रसारित होते.

### तण व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक

मुंबई : गोदरेज अग्रोव्हेटसह शेतक-यांसाठी कार्यरत असणा-या विविध संस्थांनीही आता संबंधित विषयाशी निगडीत संपूर्ण माहिती घेऊनच विचारपूर्वत निर्णय घेण्याचे ठरवले आहे. गोदरेज अग्रोव्हेटचे क्रॉप प्रोटेक्शन बिझनेसचे मुख्य कार्यकारी अधिकारी एन.के.राजवेलू म्हणाले, केवळ ताणनाशकांवर अवलंबून न राहता एकात्मिक तण व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. यामुळे केवळ शाश्र्वत उपाययोजना अबाधित राहते. अपेक्षित उत्प-ादन मिळते तसेच दीर्घकाळ जमिनीचा कस आणि आरोग्य टिकवण्यासही मदत होते.

### सुरक्षित गस्त पद्धतींवर कार्यशाळा आयोजित

नाशिक: कोटक महिंद्रा प्राईम लिमिटेडच्या सीए-सआर उपक्रमाच्या पाठबळाने, सेव्हलाईफ फाउंडेशनने २५ फेब्रुवारी २०२६ रोजी नाशिकमध्ये महाराष्ट्र हायवे सेफ्टी पो-लीस अधिकाऱ्यांसाठी अपघात तपासणी सुरक्षित गस्त पद्धती या विषयावर कार्यशाळा आयोजित केली. ही प्रशिक्षण प्रणाली झिरो-फॅटॅलिटी कॉरिडॉर कार्यक्रमांतर्गत आयोजित करण्यात आली होती, ज्याचा उद्देश रस्ते अपघातांना अधिक प्रभावीपणे प्रतिसाद देण्यासाठी आणि ते रोखण्यासाठी अंमलबजावणी कर्मचाऱ्यांची तांत्रिक आणि कार्यात्मक क्षमता बळकट करणे हा होता.

### पैसेबाजार ॲपद्वारे मोबाईल रिचार्ज आणि बिल पेमेंट

**मुंबई :** पैसेबाजार ॲप आता केवळ कर्ज आणि क्रेडिट कार्ड ॲक्सेसच नाही तर मोबाईल रिचार्ज आणि बिल पेमेंट देखील देते, हे सर्व प्लॅटफॉर्म शुल्काशिवाय. तुम्ही प्रत्येक व्यवहारावर खात्रीशीर रिवॉर्ड्सचा आनंद देखील घेऊ शकता.या लाँचसह, पैसेबाजार एक फायदेशीर आणि वारंवार वापरले जाणारे ॲप बनण्याचे उद्दिष्ट ठेवते जिथे ग्राहक त्यांच्या नियमित आर्थिक गरजा सहजपणे व्यवस्थापित करू शकतात आणि त्याचबरोबर लक्षणीय बचत देखील करू शकतात. ग्राहक पैसेबाजार ॲपवर प्रीपेड मोबाइल रिचार्ज, पोस्टपेड मोबाइल बिल, क्रेडिट कार्ड बिल पेमेंट, कर्ज परतफेड आणि वीज, डीटीएच, एलपीजी आणि पाईप गॅस सारख्या विविध उपयुक्तता बिलांसाठी सहजपणे पैसे देऊ शकतात.

### मिंत्रा तर्फे मिंत्रा बर्थडे ब्लास्टचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर:** आपला १९ वा वर्धापनदिन साजरा करतांना मिंत्रा या भारतातील आघाडीच्य । फॅशन, ब्यूटी आणि लाईफस्टाईल डेस्टिनेशन्स पैकी एक असलेल्या कंपनी तर्फे मिंत्रा बर्थडे ब्लास्ट (एमबीबी) चे आयोजन केले आहे. हा उपक्रम २८ फेब्रुवारी पासून सुरु होणार असून मिंत्रा इनसायडर ग्राहकांना २४ तास आधी म्हणजेच २७ फेब्रुवारी पासून अर्ली क्सेस देण्यात आला आहे.

# एमजीएममध्ये मराठी भाषा गौरव दिनानिमित्त ग्रंथ दिंडीने साहित्य जागर

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २७ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या मराठी भाषा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, विद्यार्थी कल्याण मंडळ, एमजीएम संस्कार विद्यालय आणि एमजीएम रेडिओ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून विद्यापीठ परिसरात ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले हो-ते. या ग्रंथ दिंडीची सुरुवात एमजीएम संस्कार विद्यालय येथून करण्यात आली. ग्रंथ दिंडीमध्ये भारतीय राज्यघटना, ग्रामगीता, मराठी विश्र्वकोश, भगवत गीता, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित पुस्तके अशा विविध





पुस्तकांचा समावेश होता.

यावेळी एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, संचालक डॉ. के. पी. सिंग, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ.आर. आर. देशमुख, एमजीएम रेडिओचे सुनिल शिरसिकर, मराठी विभागाचे डॉ.राम गायकवाड, डॉ.मारोती गायकवाड, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र गीत, पसायदान म्हणत सांस्कृतिक प्रस्तुती सादर केली. पुस्तकांचा मान, ज्ञानाचा सन्मान; शिक्षण हे स्वप्न नव्हे, साधन आहे. प्रगतीचा हा खरा मार्ग आहे; मराठी भाषा आपली शान, सदैव बाळगू तिचा अभिमान असे जनजागृतीपर फलक घेऊन विद्यार्थ्यांनी मराठी भाषेच्या वापराबद्दल संदेश दिला.

# राधिका मर्चंट यांची इनकोर कंपनीला भेट



तभा वृत्तसेवा

**पैठण, दि. २७ फेब्रुवारी :** पैठण एमआयडीसी परिसरातील औषधी उत्पादन क्षेत्रातील इनकोर हेल्थ केअर कंपनीला गुरुवार, दि. २६ रोजी सकाळी १०:३० वाजता कंपनीचे संचालिका राधिका मर्चंट-अंबानी यांनी भेट दिली. त्या हेलिकॉप्टरने संत एकनाथ सहकारी साखर कारखाना परिसरातील हेलिपॅडवर उतरल्या. त्यांच्यासोबत त्यांचे वडील विरेन मर्चंट उपस्थित होते. हेलिपॅडवरून त्या वाहनांच्या ताफ्यासह थेट कंपनीत रवाना झाल्या. त्यांच्या आगमनाची माहिती मिळताच साखर कारखाना परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. मात्र, त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. गुरुवारी झालेल्या दौऱ्यात कंपनीच्या विविध प्रकल्पांची प्रगती, उत्पादनाची गुणवत्ता, उपलब्ध सुविधा तसेच भविष्यातील विस्तार योजना यांचा सविस्तर आढावा घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. या भेटीदरम्यान एमआयडीसीचे अधिकारी, स्थानिक प्रशासनाचे प्रतिनिधी आणि कंपनीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# एमजीएमच्या विद्यार्थ्यांची भंडारदरा मोहिम यशस्वीपणे संपन्न



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर, दि. २७ फेब्रुवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ बायोसायन्स अँड टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले-ली भंडारदरा आणि सांदन दरी मोहिम यशस्वीपणे संपन्न झाली. यामध्ये महाविद्यालयाच्या ५३ विद्यार्थ्यांसह ४ प्राध्यापकांनी आपला सहभाग नोंदवला होता. संचालिका डॉ.अर्चना पंचे, प्रा.डॉ.संजय हारके, राष्ट्रीय सेवा योजेनचे समन्वयक डॉ.आर. आर.देशमुख आदि मान्यवरांनी झेंडा दाखवून मोहिमेस शुभेच्छा दिल्या. अशा मोहिमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना निसर्ग जवळून अनुभवता येतो, स्वत:तील नेतृत्व गुणांना चालना देता येते, पर्यावरणासंदर्भात जागृती, वैयक्तिक तसेच व्यक्तिमत्व विकास साधण्याची संधी मिळत असते. विद्यापीठ कायम अशा प्रकारचे उपक्रम राबवित आलेले आहे. या दोन दिवसीय मोहिमेत विद्यार्थ्यांनी कॅम्पिंग, ट्रेकिंग, झिपलाईन, रॅपलिंग अशा विविध उपक्रमांसह वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये आपला उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

या मोहिमेमध्ये विद्यापीठाचे प्रा.मुक्तानंद लोंढे, भाग्यश्री घुले आणि पल्लवी मोरे सहभागी होते. ही मोहिम अडव्हेंचर इंचार्ज डॉ.शशिकांत सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे संपन्न झाली.

ही मोहिम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ. जॉन चेल्लादुराई, क्रिडा संचालक नितीन घोरपडे, विभागप्रमुख डॉ. दिनेश वंजारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये पर्यटकांची संख्या घसरली



तभा वृत्तसेवा

**फर्दापूर, दि. २७ फेब्रुवारी :** जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मध्ये सध्या पर्यटकांची संख्या कमी झाली यांचे कारण की सध्या दहावी, बारावी यांचे पेपर सुरू असल्याने तसेच तापमानात वाढ होत असल्याने पर्यटकांची संख्या कमी झाली आहे यामुळे येथील स्थानिक व्यवसाय मंदावला आहे यामध्ये शॉंपिग पॉल्झा मधील छोटे दुकान यांच्या व्यवसायावर यांचा परिणाम झाला आहे तसेच महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे रुम तसेच लॉजिंग व्यवसाय यावर सुध्दा मोठ्या प्रमाणात व्यवसाय ठप्प झाला आहे तसेच लेणी तील डोली वाले यांची सुद्धा सध्या मजुरी ही निघत नाही सध्या वसंत ऋतू असल्याने जगप्रसिद्ध अजिंठा लेणी मधील वृक्ष वेली यांची सर्व पान गळती झाली असल्याने चौही बाजूला एक सारखा खडक दिसत आहे पावसाळ्यात याठिकाणी चोहीकडे हिरवळ असते परंतु आता सध्या हिरवळ हि हारवली आणि पर्यटकांची संख्या हि कमी झाली

# बालानगर खून प्रकरणातील आरोपीची अवघ्या २४ तासात अटक

तभा वृत्तसेवा

**पैठण, दि. २७ फेब्रुवारी :**

पैठण तालुक्यातील बालानगर येथे दि.(२३) रोजी शुल्लक कारणातून झालेल्या खुनाच्या घटनेमुळे या परिसरात एकच खळबळ उडाली होती.पैठण एमआयडीसी पोलिसांना या गुन्ह्याचा उलगडा करण्यात यश आले असून खून करून पसार झालेल्या आरोपीच्या अवघ्या चोवीस तासात मुसक्या आवळून त्यास जेरबंद करण्यात आले आहे.

या घटने विषयी मिळालेल्या माहितीनुसार पैठण एमआय डीसी पोलिस ठाण्याचे सपोनि ईश्वर जगदाळे बालानगर ते ढोरकीन रोड जवळील युसुफ जाफर पठाण यांच्या शेतातील विद्युत खांबाजवळ एक अज्ञात इसम बेशुद्ध अवस्थेत निपचित पडून आहे.व त्याच्या कपाळाला झालेल्या गंभीर जखमेतून रक्त आलेले आहे अशी माहिती मिळाली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेत त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन सदर जखमी बेशुध्द व्यक्तीस तात्काळ पैठण येथील शासकीय रुग्णालयात पाठवले असता डॉक्टरांनी त्यास तपासून मृत्य घोषित केले.पोलिसांनी त्या अज्ञात मयत व्यक्ती विषयी अधिक माहिती घेतली असता तो बालानगर येथील अहेमद जाफर पठाण असल्याचे कळाले घटना घडली



अहमद पठाण
मयत



केशव चव्हाण
आरोपी

ते सदर ठिकाण गावापासून दूर असल्याने या ठिकाणी काय झाले. याबाबत कोणाला काही माहिती नसल्याने या घटनेचा तपास लावणे हे पोलीसापुढे एक मोठे आव्हान होते.परंतु सपोनि ईश्वर जगदाळे यांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांची दोन वेगवेगळी पथक तयार करुन तपास सुरु केला असता गोपनीय सूत्राकडून माहिती मिळाली की घटनेच्या दिवशी मृत व्यक्ती अहेमद पठाण यांच्या सोबत डोणगाव तांडा येथील केशवराव चव्हाण हा व्यक्ती दिसला होता.यावरुन त्यांनी सदर आरोपीचा बालानगर,डोणगाव तांडा टेकडी तांडा, दरेगाव,सुंदरवाडी, मुकुंदवाडी या भागात शोध मोहीम राबवून ताब्यात घेतले.आरोपी केशव चव्हाण यास विश्व-ासात घेत अधिक चौकशी केली असता त्याने सांगीतले की,मी व माझी पत्नी व मयत इसम अहमद पठाण पैठण वरुन रिक्षाने आलो.व बालानगरकडे जातांना आम्ही दोघे ढोरकिन ते बालानगर रोडवरील देशी दारुच्या दुकानाजवळील एका विद्युत खांबाजवळ दारु पित असताना आमच्या दोघात भांडण झाले.या भांडणात मयत व्यक्तीने माझ्या उजव्या हाताच्या बोटाला जोरात चावा घेतला व चावा घेतलेले बोट सोडत नसल्यामुळे मी बाजूला पडलेले दगड घेऊन त्याच्या कपाळावर जोराने मारले त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला. तो मेल्याचे लक्षात आल्याने मी तेथून पसार झालो असा कबुली जवाब दिला आहे. सदर गुन्ह्याची उकल पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधिक्षक अन्नपुर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि ईश्र्वर जगदाळे, पोउपनि कविता जगताप,पोह, राहुल मोहतमल,पोह. करतारसिंग सिंगल,पोना,ज्ञानेश्र्वर भवर, पोकॉ, मिलिंद घाटेश्र्वर पोकॉ,कृष्णा उगले,पोकॉ, विष्णू कोलते, पोकॉ, रामेश्र्वर पंडीत, होमगार्ड वाल्मीक घोंगडे,श्रीकांत त्रिभुवन, नंदु मंगरे,राहुल जाधव यांनी केली असल्याची माहिती सपोनि ईश्वर जगदाळे यांनी दिली.

# जिल्हा परिषद प्रशाला सोयगावचे एन. एन. एम.एस. शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

### प्रथमच १२ विद्यार्थी यांनी उत्तीर्ण केली राष्ट्रीय स्तर पाीा परीक्षा

तभा वृत्तसेवा

**सोयगाव, दि. २७ फेब्रुवारी :** सोयगाव येथील जिल्हा परिषद प्रशाला येथील १२ विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती (छचचड)परीक्षा प्रथमच १२ विद्यार्थी यांनी उत्तीर्ण केली आ-हेत.त्यात वैष्णवी कडुबा ढगे,देवयानी गोपाल औटे,नेहा शिवदास आस्वार,अक्षरा परशुराम पंडित,पलक भागवत गायकवाड,देवयानी निलेश मिसाळ,तेजस समाधान भोकरे, गायत्री भगवान बावस्कर,पूजा शिवाजी बावस्कर,प्रांजली राजेंद्र खलसे,वृषाली गोपाल साळुंखे,पार्थ समाधान इंगळे या विद्यार्थ्यांचा यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये समावेश आहे.काही मोजके विद्यार्थी हे फार थोड्या गुणांसाठी पात्र होऊ शकले नाही मात्र त्यांचे प्रयत्न बद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.

यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार गटशिक्षणाधिकारी कार्यालय सोयगाव यांचे वतीने सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांनी सर्व विद्यार्थ्यांचा



पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून अभिनंदन केले.तसेच मुख्याध्यापक दादाराव राठोड यांचे प्रतिनिधी,वर्गशिक्षक मार्गदर्शक शिक्षक भास्कर चौधरी, संगीता सोनवणे,प्रशालेचे माजी शिक्षक पंकज रगडे, निदेशक सचिन ढगे यांचा मार्गदर्शनात ही यश मिळाल्याबद्दल त्यांचाही ही सत्कार केंद्रप्रमुख यांनी केला.

या सर्व विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे,विस्तार अधिकारी सचिन पाटील,केंद्रप्रमुख फिरोज तडवी,प्रशालेचे मुख्याध्यापक दादाराव राठोड तसेच शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनील ठोंबरे,उपाध्यक्ष भागवत गायकवाड,यांचेसह आमखेडा गटाच्या जिल्हा परिषद सदस्या पुष्प-ाताई काळे,पंचायत समिती सदस्य जयश्री गजानन पवार, नगराध्यक्ष अशाबी तडवी, उपनगराध्यक्ष सुरेखा प्रभाकर(आबा)काळे, माजी विद्या-र्थी संघ अध्यक्ष तुकाराम तायडे, उपाध्यक्ष संदीप चौधरी, कार्याध्यक्ष नीलेश गाडेकर, कोशाध्यक्ष गिरीश जगताप, रवींद्र काळे, नगरसेवक हर्षल काळे, राजू दुतोंडे, गटनेते अक्षय काळे, राजू जावळे, कदिर शहा,रऊफ देशमुख,शिक्षणप्रेमी सदस्य संजय शहापूरकर, समाजसेवक तथा कृषी भूषण अरुण सोहनी,सुनील गावंडे, मयूर मनगटे, मंगेश सोहनी, कृष्णा जुनघरे,ललित पंडित, शांताराम ढगे,अमृतेश्र्वर शिक्षक पतसंस्था सोयगावचे चेअरमन विठ्ठल राठोड व्हा. चेअरमन दुर्गादास बलांडे,सचिव संदीप चौधरी व सर्व संचालक मंडळ,शिक्षक संघ अध्यक्ष कृष्णा पाटील,शिक्षक भारती अध्यक्ष किरणकुमार पाटील,शिक्षक सेना अध्यक्ष रवींद्र शेळके यांचे सह तालुक्यातील सर्व शिक्षक संघटनाचे अध्यक्ष पदाधिकारी व शिक्षक व शिक्षणप्रेमी नागरिक पालक यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

या सर्व विद्यार्थी यांना मुख्याध्यापक दादाराव राठोड यांचे नेतृत्वात वर्गशिक्षक भास्कर चौधरी,संगीता सोनवणे विशेष सहकार्य पंकज रगडे,सचिन ढगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले त्यांना प्रशालेचे सर्व शिक्षक सुकदेव पाटील,शिवाजी नवले, दौलतसिंग परदेशी,राजेंद्र उंबरकर,जया वाघ, तुकाराम पायाघन, विद्याधर बागुल,वैजनाथ सावळे, संतोष भारद्व-ाज निदेशक शिवराम आगे,सीमा राऊत यांनी मोलाचे सहकार्य केले.विद्यार्थी यांचे यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

जाहीर प्रगटन

**मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात**

दि.कि.अर्ज न.७३/ २०२६ पुढील दिनांक २१/०३/२७२६
अर्जदार :-१. सुनिता भ्र. दशरथ पगारे, वय ४० वर्ष, धंदा घरकाम, रा. औराळा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद
२. सुस्मीता भ्र. अनिल साळवे, वय २२ वर्ष, धंदा घरकाम, रा. औराळा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ३. ऋतिक पि. दशरथ पगारे, वय २१ वर्ष, धंदा घरकाम, रा. औराळा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४. प्रमोद पि. दशरथ पगारे, वय २० वर्ष, धंदा घरकाम, रा. औराळा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ५. सुंदराबाई भ्र. विश्र्वनाथ पगारे, वय ६५ वर्ष, धंदा घरकाम, रा. औराळा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद
विरुध्द
गैरअर्जदार :-निरंक
प्रकरण :-अर्जदार नं. १ ते ५ हे मयत दशरथ विश्र्वनाथ पगारे यांचे कायदेकशीर वारस आहे असे वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.
ज्याअर्थी वरील अर्जदारांनी या न्यायालयात ॲड. संजय एस. बोर-से, कन्नड यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ४ याचे वडील व अर्जदार नं. ५ चा मुलगा हे मयत दशरथ विश्र्वनाथ पगारे हे होते व ते मौ. औराळा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. येथील रहीवासी होते. ते अल्पश्या आजाराने दि. १३/४/२०२५ मध्ये मयत झालेले आहेत. त्यांना कायदेशीर वारस अर्जदार नं. १ ते ५ हे होते व आहेत. सदर वारसांव्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत.
तसेच मयत दशरथ विश्र्वनाथ पगारे यांचे वडील विश्र्वनाथ पगारे हे १५ वर्षा पुर्वी मयत झालेले आहे. मयत दशरथ विश्र्वनाथ पगारे हे शेती करत होते. मयत दशरथ विश्र्वनाथ पगारे यांचे अर्जदार नं. १ ते ५ हे कायदेकशीर वारस असल्यामुळे सदर वारसांव्यतिरीक्त इतर कोणीही वारस नाहीत.
तसेच सदर वारसप्रमाण पत्राची शासकीय व निमशासकीय कार्यालयात तसेच शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी व अन्य कामा करीता वारस प्रमाण पत्र हे अर्जदार नं. १ ते ५ यांच्या नावे देण्यात यावे. अर्जदार नं. १ ते ५ हे एकाच कुटुंबातील असल्यामुळे त्याचे आपसात सलोख्याचे, प्रेमाचे, चांगले संबंध आहे. अर्जदार नं. १ ते ५ यांच्या नावे सदर वारस प्रमाण पत्र मिळण्याबाबत अर्जदार नं. १ ते ५ यांची स्वइच्छेप्रमाणे संमत्ती आहे. ज्या कोणाचा उजर आक्षेप असेल तर त्याने आपला उजर व आक्षेप सदरील जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाच्या आत मुळ कागदपत्रांसह लेखीस्वरुपात या न्यायालयात नोंदवावा मुदतीत कोणताही उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार नं. १ ते ५ हे मयत दशरथ विश्र्वनाथ पगारे यांचे कायदेशीर वारस आहे यांचे कायदेशीर वारस आहेत. या बाबत अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला उजर व आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.
आज दि. २३/०२/२०२६ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.
आदेशावरुन,

व्ही. राम-पाखरे
सहायक अधिकारी
दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

जाहीर प्रगटन

**मा. श्री.एन.आर. ढोके साहेब, सह-दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांक: ६३/२०२६
पुढील तारीख: ०२/०४/२०२६
अर्जदार
१) शेख वाहिदोददीन जुल्फीकारोवदीन, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. नागापुर, ता. कनड, जिल्हा छ. संभाजीनगर २) शे. सईदोदीन शे. जुल्फीकारोदीन, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. नागापुर, ता. कनड, जिल्हा छ. संभाजीनगर आर- ३) शेख खालेदोददीन जुल्फीकारोवदीन, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ.संभाजीनगर ४) मोहम्मद सौदोददीन जुल्फीकारोददीन, वय ३७ वर्षे,धंदा शेती, रा. नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ.संभाजीनगर ५) अजरनाज मोहम्मद अजहर, वय ५० वर्षे,धंदा घरकाम, रा. पदमपुरा, छावणी, जिल्हा छ. संभाजीनगर ६) इम्राना बेगम सादेकखान पठाण, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. भोकरदन, ता. भोकरदन, जिल्हा जालना. ६) जुनेरा खानम नूर मोहम्मद खान, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा. वांगी रोड, युसूफ कॉलनी, परभणी, तालुका व जिल्हा परभणी. ७) बुशरा अंजुम जावेद शेख, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. महेताब नगर, गल्ली नंबर ३, कन्नड, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर
-विरुध्द
गैरअर्जदार -निरंक
अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे कायदेशीर बारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..
ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील ॲड. डी. डी. जोशी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून या न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ ते ८ यांची आई नामे जुबेदाबेगम जुल्फकारोददीन शेख या दिनांक १५.४.२००६ रोजी मौजे नागापुर, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद, येथे मयत झालेल्या आहे, व त्यांचा दफन विधी नागापुर ता. कनड येथे झालेला आहे. सोबत ग्राम पंचायत नागापुर यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र मुळ अर्जा सोबत दाखल केले आहे. तसेच अर्जदार क्रमांक १ ते ८ यांचे वडील नामे जुल्फकारोददीन जहीरोददीन शेख हे दिनांक १२.६.२०१४ रोजी मौजे नागापुर, ता. कनड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद, येथे मयत झालेले आहे, व त्यांचा देखील दफन विधी नागापुर ता. कन्नड येथे झालेला आहे. मुळ अर्जा सोबत ग्राम पंचायत नागापुर यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदार क्रमांक १ ते ८ यांची आजी नामे शनाबर बेगम तिहारोददीन शेख हया दिनांक २३.७.२०१३ रोजी मयत झाल्या आहेत, मुळ अर्जा सोबत त्यांचा मृत्यु दाखला दाखल केला आहे. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक १५.०१.२०२६ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.
त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.
सबब आज दिनांक २०/०२/२०२६ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.
दिनांक : २०/०२/२०२६
आदेशावरुन

व्ही. राम-पाखरे
सहायक अधिकारी
दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड